रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ३५
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, २१ ऑगस्ट २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अल्पवयीन मुलगी गर्भवती; तरुणाविरोधात गुन्हा/२

नवीन पनवेलमध्ये गांजाविक्रीचा पर्दाफाश/६

वेस्ट इंडिज मालिकेपूर्वी रोहित शर्माचा सराव/८

## उबाठा, काँग्रेसला धक्का; नगरसेवक भाजपमध्ये



**सोलापूर** : कळंब नगरपालिकेतील उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेच्या नऊ नगरसेवकांसह काँग्रेसच्या एका नगरसेविकेने गुरुवारी (दि.२०) भाजपमध्ये प्रवेश केला. डिसेंबरमध्ये झालेल्या येथील नगरपालिका निवडणुकीत शिवसेनेच्या सुनंदा शिवाजी कापसे लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून विजयी झाल्या होत्या. त्यांनी ठाकरे सेनेच्या रश्मी संजय मुंदडा यांचा २,२५४ मतांनी पराभव केला होता. निवडणुकीत शिवसेनेचे चार, भाजपचे सहा, ठाकरे सेनेचे नऊ आणि काँग्रेसचा एक नगरसेवक निवडून आला होता. सभागृहात प्रभावी नेतृत्व राहावे यासाठी आमदार कैलास पाटील यांनी ठाकरे सेनेचे नेते संजय मुंदडा यांची स्वीकृत नगरसेवक म्हणून नियुक्ती केली होती. त्याच मुंदडा यांच्यासह ठाकरे सेनेच्या नऊ नगरसेवकांनी आणि काँग्रेसच्या एका नगरसेविकेने सोलापूर येथे भाजपमध्ये प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी सर्वांचे स्वागत केले.

# राज्यात सुटे खाद्यतेल विक्रीस बंदी!

**मुंबई : प्रतिनिधी**

आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर राज्यभरात भेसळीविरोधात धाडसत्र सुरू केले आहे. त्यांनी आता खाद्यतेलाकडे आपला मोर्चा वळवला आहे. यापुढे सुटे खाद्यतेल विक्रीस बंदी असल्याचे सांगून ते विकणाऱ्यांवर कारवाई केली जाणार असल्याचे मुंढे यांनी गुरुवारी (दि.२०) पत्रकार परिषदेत स्पष्ट केले.

मुंढे म्हणाले, 'सेफ फूड, सेफ महाराष्ट्र' याअंतर्गत आपण काम करीत आहोत. आधी हॉटेल्स, रेस्टॉरंट्स, मिल्क प्रोडक्टबाबत



ऑर्डर काढली आहे. राज्यातील शाळांच्या बाबतीतही कंप्लायन्स ऑर्डर काढली होती. या सर्वांची अंमलबजावणी सुरू आहे. आता पुढील कंप्लायन्स ऑर्डर आपण आजपासून जारी करीत आहोत, जी खाद्यतेलाच्या बाबतीत आहे. २०११च्या कायद्यानुसार लायसन्स असणे किंवा रजिस्ट्रेशन्स असणे तसेच फूड प्रॉडक्टच्या बाबतीत

### तुकाराम मुंढेंचा आणखी एक धडक निर्णय

जे नियम आहेत ते पाळणे आणि त्यानुसार खाद्यतेलाचे प्रोडक्शन व विक्री करणे गरजेचे आहे.

'खाद्यतेल सर्वांच्या घरात असते. हे खाद्यतेल आपल्याला वेगवेगळे पदार्थ बनवण्यासाठी लागते, मात्र मागील काही दिवसांत खाद्यतेलाच्या बाबतीत गंभीर बाबी आढळल्या आहेत. तेलाचा खरा स्रोत आणि तारीख व लेबलिंग लपवल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे यापुढे सुटे खाद्यतेल विक्री करताना आढळल्यास त्यांच्यावर कारवाई होणार आहे', असे मुंढे यांनी स्पष्ट केले.

### उल्लंघन केल्यास दंड, तुरुंगवासाची शिक्षा

सुटे खाद्यतेल विकता येत नाही. किरकोळ खाद्यतेल विक्रेत्यांनी आता सुटे तेल खरेदी करू नये तसेच भेसळयुक्त तेल विकल्यास सात वर्षांची शिक्षा आणि १० लाखांचा दंड होऊ शकतो. काही दिवसांपूर्वी मुदत संपलेले तेल पुन्हा विकल्याचे तसेच गंज लागलेल्या डब्यात तेल साठवून ठेवल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे आता तेलावर लेबलिंग आणि स्रोत आवश्यक आहे. ते नसल्यास कारवाई केली जाईल, असा इशारा मुंढे यांनी यावेळी दिला.

# स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना मोफत दप्तर

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांना आता मोफत शालेय दप्तर योजनेंतर्गत दप्तर मोफत देण्यात येणार आहे. शालेय शिक्षण विभागाने यासंदर्भात शासन निर्णय जारी केला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्याच्या उपक्रमाचा हा एक भाग आहे. प्राथमिक शिक्षण संचालनालयाच्या माध्यमातून इयत्ता पहिली ते पाचवी आणि सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांना दप्तर पुरविण्याची

### राज्य सरकारचा निर्णय



प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

दप्तराच्या खरेदी प्रक्रियेत डिझाइन व पुरवठ्यासाठी स्वतंत्र किंवा वेगवेगळ्या किमती दाखविणाऱ्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत. यामुळे खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यावर भर दिला आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य पुरविण्याच्या व्यापक योजनेंतर्गत सायन्स किट, प्रयोगशाळा साहित्य, डेस्क-बेंच व अन्य शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यासाठीही प्रशासकीय मान्यता देण्यात आली. यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांना दिलासा मिळणार आहे.

### १७४ कोटींच्या प्रस्तावाला मंजुरी

*दप्तर खरेदीसाठी शासनाकडे सादर करण्यात आलेल्या १७४ कोटी १९ लाख ३५ हजार ४२४ रुपयांच्या प्रस्तावाला अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यासाठी विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेऊन दप्तरांची खरेदी केली जाणार आहे. दप्तरांची खरेदी करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबवण्यात येणार असून शासनाने यापूर्वी निश्चित केलेल्या नियम व अटींचे पालन करणे बंधनकारक असेल.*

# काँग्रेसने 'वंदे मातरम्'बाबत मंजूर केलेला ठराव संविधानविरोधी : मुख्यमंत्री

**नागपूर : प्रतिनिधी**



काँग्रेस पक्षाने वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताबाबत मंजूर केलेला ठराव पूर्णपणे संविधानविरोधी असून स्वतंत्र भारताच्या संसदेने घेतलेला निर्णय अमान्य करणे हे मानसिक गुलामगिरीचे लक्षण असल्याची टीका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. नागपूर येथे प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना त्यांनी काँग्रेस पक्ष आणि राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला.

काँग्रेस पक्षाने 'वंदे मातरम्'बाबत नुकताच एक ठराव मंजूर करत या गीताची दोन कडवीच गाण्याबाबत भूमिका घेतली आहे. याबाबत विचारले असता मुख्यमंत्री म्हणाले, आता देशात ब्रिटिशांचे राज्य नसून स्वतंत्र भारताच्या संसदेने घेतलेला प्रत्येक निर्णय हा संवैधानिक असतो, मात्र संसदेचा निर्णय मानणार नाही आणि गुलामीची परंपरा कायम ठेवू, असा पवित्रा काँग्रेस घेत असल्याचे यातून दिसून येते.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या पुण्यातील 'छात्रो की गुंज' या कार्यक्रमावरही मुख्यमंत्र्यांनी टीका केली. राहुल गांधी यांनी सरसकट सर्वसामान्य तरुणांशी संवाद साधला असता तर आनंद झाला असता, मात्र माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार काँग्रेस नेत्यांच्या मालकीच्या किंवा त्यांच्याद्वारे संचालित महाविद्यालयांमधील मुलींचेच रजिस्ट्रेशन करून त्यांना या कार्यक्रमात आणले जात आहे, असा दावा त्यांनी केला.

यावेळी बोलताना मुख्यमंत्र्यांनी लाडकी बहीण योजनेबाबतच्या निकषांचा पुनरूच्चार केला. छाननीत आयकर भरणाऱ्या कुटुंबांचे अर्ज नियमात बसत नसल्याचे स्पष्ट झाले असून पात्र आणि शंभर टक्के व्हेरिफाईड ठरलेल्या महिलांना सरकार असेपर्यंत नियमितपणे लाभ मिळत राहील, असे त्यांनी म्हटले.

# साऊंड सिस्टीम व्यावसायिकांना नियमांच्या चौकटीत संधी द्यावी

## असोसिएशनकडून आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन; सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी दहीहंडी, गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवासारख्या मोठ्या सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर साऊंड सिस्टीम व्यावसायिकांना कायदेशीर नियमांचे पालन करून व्यवसाय करण्याची संधी द्यावी तसेच नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांवर पोलीस प्रशासनाकडून होणारी कठोर कारवाई थांबवून सहकार्याची भूमिका घेण्यात यावी, अशी मागणी साऊंड, लाईट, ट्रस्ट, जनरेटर, एलईडी स्क्रीन ओनर्स असोसिएशनच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात



असोसिएशनच्या शिष्टमंडळाने पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन त्यांना निवेदन सादर केले.

या निवेदनाची आमदार प्रशांत ठाकूर यांनी गांभीर्याने दखल घेतली असून लवकरच पोलीस उपायुक्त, असोसिएशनचे पदाधिकारी आणि सदस्य यांची संयुक्त बैठक आयोजित करून या प्रश्नावर सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. यावेळी असोसिएशनचे पदाधिकारी तसेच सल्लागार निलेश सोनावणे उपस्थित होते.

असोसिएशनने दिलेल्या निवेदनानुसार पनवेल परिसरातील सुमारे २०० ते ३०० स्थानिक भूमिपुत्र साऊंड, लाईट, जनरेटर, एलईडी स्क्रीन आदी व्यवसायांमध्ये कार्यरत आहेत. (पान २ वर..)

### पोलीस प्रशासनाच्या सहकार्याची अपेक्षा

कायदेशीर नियमांचे पालन करून व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांवर तातडीने गुन्हे दाखल करणे अथवा साहित्य जप्त करण्याऐवजी प्रशासनाने प्रथम समज, सूचना आणि आवश्यक ते मार्गदर्शन करून सहकार्याची भूमिका घ्यावी, अशी मागणी असोसिएशनने केली आहे. आगामी सण-उत्सवांच्या काळात ध्वनी प्रदूषणासंदर्भातील नियमांचे पालन करून किमान दोन बेस आणि दोन टॉप साऊंड सिस्टीम वापरण्यास परवानगी देण्यात यावी, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## निवडक

### काँग्रेसचे माजी खासदार सज्जन कुमार यांचे निधन



**नवी दिल्ली** : काँग्रेसचे माजी खासदार आणि १९८४मधील दिल्लीत झालेल्या शीखविरोधी दंगलीतील आरोपी सज्जन कुमार यांचा ८०व्या वर्षी तुरुंगवास भोगत असताना मृत्यू झाला आहे. दंगलीच्या गुन्ह्यात ते तिहारमध्ये जन्मठेप भोगत होते. रुग्णालयात नेण्यापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली.

### झारखंडमधील भरती रद्दच्या आदेशाला हायकोर्टाची स्थगिती

**रांची** : झारखंड उच्च न्यायालयाने जेएसएससी आणि जेपीएससीच्या नियुक्त्या रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या आदेशाला स्थगिती दिली. यामुळे भरती प्रक्रियेबद्दल चिंतित असलेल्या लाखो विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

### धावत्या ट्रेनमधून प्रवाशाला ढकलले; आरोपी ताब्यात

**मुंबई** : पश्चिम रेल्वेमार्गावरील चर्चगेटहून बोरिवलीकडे जाणाऱ्या लोकलमध्ये झालेल्या किरकोळ वादानंतर एका प्रवाशाने दुसऱ्याला ट्रेनमधून बाहेर ढकलले. गंभीर जखमी झालेल्या प्रवाशाचा रुग्णालयात मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.

# पनवेलमध्ये साकारणार बहुमजली यांत्रिकी वाहनतळ

## महापालिकेचा निर्णय; महासभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची महासभा गुरुवारी (दि. २०) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात महापौर नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी विविध विषयांवर चर्चा करून उचित मंजुरी देण्यात आली.

मंचावर उपमहापौर प्रमिला पाटील, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, सचिव नानासाहेब कामठे, उपसचिव अक्षय कदम उपस्थित होते. महासभेत नूतन प्रभाग समिती सभापतींचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी पनवेल शहरातील अं.भू.क्र.१८४/१ ए पार्ट बहुमजली यांत्रिकी वाहनतळ उभारणे प्रस्तावास व खर्चास मान्यता मिळण्याबाबतचा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आला. अमरधाम स्मशानभूमी (अं.भू.क्र.१०६) येथील नादुरूस्त गॅसदाहिनी बदलून नवीन गॅस दाहिनी बसवणे (दोन युनिट). या कामासही मंजुरी देण्यात आली.



प्रभाग समिती अ, खारघर (प्रभाग क्र.१ ते ६), प्रभाग समिती ब, कळंबोली (प्रभाग क्र.७,८,९,१०,१५ व १६), प्रभाग समिती क, कामोठे (प्रभाग क्र. ११,१२,१३ व १४) आणि प्रभाग समिती ड, पनवेल (प्रभाग क्र. १७,१८,१९ व २०)मधील रस्ते दुरुस्तीकरिता वार्षिक दराने काम करणे (सन २०२६-२७ व २०२७-२८ या दोन वर्षांसाठी) हा विषय महासभेत मंजूर करण्यात आला.

महापालिका मालकीच्या करंजाडे येथील सर्व्हे नं.११०/ब या जागेवर मच्छी मार्केट उभारण्याचा विषय योग्य सूचनांसह मंजूर करण्यात आला. प्रभाग समिती अ, खारघर, सेक्टर १३, भूखंड क्र.१३७ येथे सामाजिक सभागृह बांधणे, प्रकल्प राबविणे व संकल्प चित्रास प्रशासकीय व आर्थिक मान्यता मिळण्याबाबतच्या विषयास योग्य सूचनांसह मंजुरी देण्यात आली.

मौजे तळोजे मजकूर येथील विकास योजनेत दर्शविलेल्या आरक्षण क्र. व्ही १५० (कोंडवाडा) या भूखंडावर लहान व मोठ्या प्राण्यांकरिता निवारा केंद्र उभारण्याचा विषय रद्द करण्यात आला. दूरसंचार नेटवर्क/मोबाइल टॉवरवरील मालमत्ता कर रद्द करण्याबाबतचा विषय नामंजूर करण्यात आला, तर समाज विकास विभाग अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रातील वास्तव्य करणाऱ्या युवक-युवतींना नवी मुंबई एअरपोर्ट १८ प्रशिक्षण मोफत देण्याबाबतचा विषय स्थगित करण्यात आला.

महापालिकेच्या मालकीच्या अंतिम भूखंड क्र. १२२वर मराठी व इंग्रजी माध्यमाची शाळा बांधण्याचा विषय मंजूर करण्यात आला. नवीन पनवेल सेक्टर ४, भूखंड क्र. सी २० आणि कळंबोली सेक्टर १२, भूखंड क्र.बी ४ येथे उद्यान विकसित करण्याचा विषय महासभेत मंजूर केला.

दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन पनवेल (पू) से. १६, प्लॉट नं.७/बी, येथे शिक्षण, प्रशिक्षण सेवा व आरोग्य सेवा केंद्र (एज्युकेशन ट्रेनिंग अँड सर्व्हिस सेंटर) म्हणजेच दिव्यांग भवन बांधण्याचा विषय मंजूर करण्यात आला. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहातील पॅसेंजर लिफ्ट बदलून नवीन लिफ्ट स्थापन करण्याच्या विषयासही यावेळी मंजुरी देण्यात आली. (पान २ वर..)

# मोठ्या पीओपी गणेशमूर्तींचे यंदाही नैसर्गिक जलस्रोतांमध्ये होणार विसर्जन

**मुंबई : प्रतिनिधी**



प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) तयार केलेल्या सहा फुटांवरील गणेशमूर्तींचे गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जन होणार आहे. उच्च न्यायालयाने गुरुवारी (दि.२०) ही बाब स्पष्ट केली. त्यामुळे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना मोठा दिलासा मिळाला आहे.

पीओपीने तयार केलेल्या गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जन करण्याविरोधात केलेल्या जनहित याचिकेवर प्रदीर्घ युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने गेल्या शुक्रवारी निर्णय राखून ठेवला होता, तथापि निर्णय राखून ठेवताना दिलेल्या अंतरिम आदेशाबाबत संभ्रम निर्माण झाला असून त्याच्या स्पष्टतेची विनंती राज्य सरकारतर्फे न्यायालयाकडे करण्यात आली होती.

यावर न्यायमूर्ती अजय गडकरी आणि न्यायमूर्ती कमल खाता यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. यावेळी याचिकेवरील निर्णय दिला जाईपर्यंत ९ जून २०२५ नाही, तर २४ जुलै २०२५ रोजी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी केली जाईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले. या आदेशानुसार सहा फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावांत विसर्जन करणे बंधनकारक करण्यात आले होते, तर सहा फुटांवरील गणेशमूर्तींचे नैसर्गिक जलस्रोतांत विसर्जनास परवानगी देण्यात आली होती. हा अंतरिम आदेश निकाल दिला जाईपर्यंत लागू राहील, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# बांबूपासून पर्यावरणपूरक राख्यांची निर्मिती

## *लोणेरे विद्यापीठात प्रशिक्षण आणि विक्री*

**माणगाव : बातमीदार**

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्रीय विद्यापीठात बांबू कौशल्य विकास आणि संशोधन केंद्राच्या माध्यमातून महिला, युवक, बचत गट आणि कारागिरांना बांबू हस्तकला व विविध उत्पादनांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. या उपक्रमाला आता विद्यापीठ परिसरातही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

केंद्रामार्फत प्रशिक्षित महिला बचत गटांनी पर्यावरणपूरक पद्धतीने तयार केलेल्या आकर्षक बांबूच्या राख्या विद्यापीठ परिसरात विक्रीसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. या राख्यांना विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी यांच्याकडून चांगला प्रतिसाद मिळत असून पारंपरिक राखीला पर्यावरणपूरक आणि आकर्षक पर्याय म्हणून



बांबूच्या राख्यांकडे पाहिले जात आहे.

विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजनिश कामत यांच्या मार्गदर्शनाखाली विविध महिला बचत गटांच्या कार्याला प्रोत्साहन देण्यात येत आहे. याच अनुषंगाने कुलसचिव डॉ. अमित शेष आणि बांबू प्रकल्प समन्वयक डॉ. सचिन पोरे यांच्या वतीने सहभागी महिला बचत गटांचा सत्कार करून त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

महिला बचत गटांना प्रशिक्षण, उत्पादन निर्मिती आणि बाजारपेठ उपलब्ध करून देत महिला सक्षमीकरणाला चालना देणे हा बांबू कौशल्य विकास आणि संशोधन केंद्राचा प्रमुख उद्देश आहे. बांबूच्या राख्यांना मिळत असलेला प्रतिसाद हा या प्रयत्नांना मिळणारी उत्साहवर्धक दाद असून ग्रामीण महिलांच्या कौशल्याला बाजारपेठ मिळवून देण्याच्या दिशेने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.

### स्थानिक महिलांना रोजगार

बांबूपासून राख्यांसह विविध मूल्यवर्धित वस्तूंची निर्मिती आणि विक्री केल्यामुळे महिलांना कौशल्य विकासासोबतच स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध झाली आहे. स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या बांबूचा कल्पकतेने वापर करून उत्पादनांची निर्मिती केल्यास ग्रामीण भागातील महिलांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, हे या उपक्रमातून अधोरेखित होत आहे.

## अशोकमामांचा नागरी सत्कार



**नागपूर : येथील महानगरपालिका, विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि श्री सिद्धिविनायक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ चित्रपट अभिनेते महाराष्ट्र भूषण पद्मश्री अशोक सराफ यांचा नागरी सत्कार करण्यात आला. या सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**

### ॲडव्हान्स घेऊनही जलजीवन मिशनची कामे अर्धवट ठेवणाऱ्या

# ठेकेदारांविरुद्ध होणार गुन्हे दाखल

**अलिबाग : प्रतिनिधी**

ॲडव्हान्स घेऊनही जल जीवन मिशनची कामे अर्धवट ठेवणाऱ्या ठेकेदारांविरुद्ध गुन्हे दाखल करण्याचे निर्देश केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी दिल्याची माहिती रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.गुरूवारी (दि. २०) अलिबाग येथील हॉटेल ताज येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत खासदार सुनील तटकरे बोलत होते.



आपण सी. आर. पाटील यांची भेट घेऊन निधी अभावी कामे रखडली आहेत, ठेकेदारांची देणी थकली आहेत हे त्यांच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी लगेचच जलजीवन मिशनचे राज्य सरकारला देय असलेले ४३८ कोटी रुपये त्यांनी सरकारला दिले. त्यानंतर त्यांनी राज्यातील सर्वपक्षीय खासदारांची बैठक बोलावून आढावा घेतला. राज्याच्या सर्वच भागात याबाबत सारखीच स्थिती असल्याचे निदर्शनास आल्याचे तटकरे यांनी सांगितले.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील खारपाडा आणि सुकेळी या दोन टोल मधील अंतर केवळ ४२ किलोमीटर आहे त्यामुळे सुकेळीचा टोल सुरू करू नये अशी विनंती मी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना केली होती त्यानुसार सुकेळी येथील टोल सुरू होणार नाही. महामार्गाचे काम पूर्ण झाल्याशिवाय टोल सुरू करू नका अशी विनंती आपण गडकरी यांना केली होती. त्यामुळे खारपाडा येथील टोल वसुली लवकरच बंद होईल. खारपाडा येथील टोलच्या दारात वाढ केल्याची माहिती आपल्याकडे नाही यासंदर्भात आपण नितीन गडकरी तसेच महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांशी तातडीने संपर्क करणार आहोत अशी महिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली.

दिघी पोर्टच्या विस्तारित प्रकल्पाला स्थानिक मच्छीमारांनी विरोध केला आहे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जाईल त्यांनी जे आक्षेप नोंदवले आहेत याची पूर्तता केली जाईल या संदर्भात आपण आदानी पोट जवळ संपर्क साधून मच्छीमार आणि पोर्ट यांच्यात बैठक घडवून आणू आणि यातून चांगला मार्ग काढू जर मच्छीमारांचे प्रश्न सुटले नाहीत तर पोर्टच्या विस्तारीकरणावर विचार केला जाईल, असे खासदार तटकरे यांनी सांगितले.पेण व रोहा रेल्वे स्थानकात लांबपल्ल्याच्या गाड्यांना थांबा मिळावा यासाठी आपण रेल्वे मंत्र्यांना भेटलो. याबाबत लावकरच निर्णय होईल. कर्जतमध्ये तीन व नागोठणे येथे एक असे चार रेल्व पूल मंजूर झाले आहेत.

त्याच प्रमाणे ताम्हीणी घाटात टनेल खोदण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. अलिबाग येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या कामाकरीता १५ कोटी रूपये मंजूर करण्यात आले आहेत, अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी यावेळी दिली. आमदार अनिकेत तटकरे, रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील, राष्ट्रवादी काँग्रसचे रायगड जिल्हा परिषदेचे प्रतोद अमित नाईक, सुधाकर गारे यावेळी उपस्थित होते.

# पालकमंत्री भरत गोगावलेंचे महाडमध्ये जंगी स्वागत

**महाड : प्रतिनिधी**

प्रदीर्घ संघर्षानंतर महाडचे आमदार तथामंत्री भरत गोगावले यांना पालकमंत्रीपद मिळाल्यानंतर त्यांचे बुधवारी महाड येथे जंगी स्वागत करण्यात आले तसेच गुरुवारी सकाळी त्यांनी किल्ले रायगड येथे सह कुटुंब छत्रपती शिवाजी महाराज व राजमाता जिजाऊ यांच्या समाधीला अभिवादन करून पालकमंत्रीपदाच्या कार्यास प्रारंभ केला.



रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी मिळाल्यानंतर मंत्री भरत गोगावले यांनी आज दुर्गराज रायगडाला भेट देऊन श्री जगदीश्वर मंदिरात दर्शन घेतले. यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळी नतमस्तक होऊन अभिवादन केले. तसेच पाचाड येथे राजमाता जिजाऊ समाधीस्थळी जाऊन त्यांनी श्रद्धापूर्वक अभिवादन केले.

यावेळी बोलताना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, "छत्रपती शिवाजी महाराज हे माझ्या प्रत्येक वाटचालीचे प्रेरणास्थान आहेत. महाराज नसते, तर आज आपण पाहत असलेले सुराज्य कधीच घडले नसते. त्यामुळे त्यांच्या विचारांचा आणि आदर्शांचा मावळा म्हणून काम करण्याची माझी कायमच भावना राहिली आहे." रायगड ही केवळ आपली कर्मभूमी नसून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याची राजधानी असल्याचे सांगत ते म्हणाले, "या पवित्र भूमीच्या विकासाची जबाबदारी मिळणे ही माझ्यासाठी मोठी भाग्याची आणि तितकीच मोठी जबाबदारीची गोष्ट आहे. महाराजांना साक्षी ठेवून रायगड जिल्ह्याचा सर्वांगीण विकास, जनतेचे प्रश्न आणि नागरिकांचे हित हेच केंद्रस्थानी ठेवून छत्रपती शिवाजी महाराजांचा मावळा म्हणून रायगडच्या विकासासाठी कटिबद्ध राहीन.

ना. गोगावले यांचे सायंकाळी त्यांचे महाड येथे जंगी स्वागत करण्यात आली यावेळी हजारोंच्या संख्येने शिवसैनिक, व्यापारी व नागरिक शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.

# बारसगाव येथे जलसंसाधन विकास प्रकल्पाचा शुभारंभ

**महाड : प्रतिनिधी**

सुदर्शन सीएसआर फाउंडेशन आणि वनराई संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने महाड तालुक्यातील बारसगाव येथे जलसंसाधन विकास प्रकल्पाचा शुभारंभ मंगळवारी करण्यात आला.



प्रकल्पाच्या फलकाचे उद्घाटन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. बारसगाव परिसरातील जलसंसाधनांचे संवर्धन, पाण्याची उपलब्धता वाढविणे, जलस्रोतांचे शाश्वत व्यवस्थापन तसेच स्थानिक समुदायाच्या उपजीविकेच्या संधींना चालना देणे, हा या उद्देशातून हा प्रकल्प याठिकाणी राबविण्यात येत आहे. यावेळी सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडच्या जीएम-सीएसआर व ईएसजी माधुरी सणस यांनी सुदर्शन कंपनीच्या सीएसआर उपक्रमांमधून स्थानिक गरजा, लोकसहभाग आणि दीर्घकालीन परिणामांना महत्त्व देऊन प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी ग्रामस्थांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले.

वनराई संस्थेचे सचिव अमित वाडेकर यांनी जलसंधारणाच्या माध्यमातून गावातील उपलब्ध जलस्रोतांचे संवर्धन करून गावाच्या सर्वांगीण व शाश्वत विकासाला चालना देता येईल असे स्पष्ट केले.

वनराई संस्थेचे विनायक गारडे यांनी देखील यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेडचे आयआर प्रमुख संदीप काशीद, महाड येथील सीएसआर सहाय्यक व्यवस्थापक संजय कचरे, एचआर प्रमुख मनीषा बर्वे, फिल्ड ऑफिसर दिशांत ढाणे, वनराईचे पीआर प्रमुख शशांक गराडे आणि उदय पोळ यांसह सरपंच सोनल उतेकर, उपसरपंच, ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ तसेच स्वयं-सहायता समूहातील महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लिमकर सर यांनी केले. प्रास्ताविक वनराई संस्थेचे सचिव अमित वाडेकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन बारसगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच सोनल उतेकर यांनी केले.

# भाजप नगरसेवकांशी समन्वय साधून निर्णय घ्या; खोपोली नगराध्यक्षांना पत्र

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका शालेय समितीच्या सभापती निवड करताना विश्वासात घेतले गेले नसल्याने भाजप नगरसेवकांनी नगराध्यक्षांना पत्र दिले आहे.



शालेय शिक्षण समिती माध्यमिक विभागाच्या सहा शाळा असून या सर्व शाळांच्या सभापतीपदांवर शिवसेना नगरसेवकांची वर्णी लावण्यात आली आहे. यामध्ये प्रतिनिधीत्व न मिळाल्याने युतीमधील भाजप नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात भाजपच्या वतीने तातडीने आयोजित केलेल्या बैठकीत पडसाद उमटले.

भाजपचे शहराध्यक्ष अजय इंगुलकर यांनी खोपोली नगरपालिकेत शिवसेना-भाजप युती असताना भाजप नगरसेवकांबद्दल अशी भूमिका घेणे अयोग्य असल्याचे सांगितले. या भूमिकसंदर्भात पक्षाच्या बैठकीत नगराध्यक्षांना पत्र देण्याविषयी ठरले. त्यानुसार गुरुवारी सकाळी अजय इंगुलकर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे पदाधिकारी व नगरसेवक यांनी नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांना पत्र देऊन आपल्या भावना व्यक्त केल्या.

यावेळी नगराध्यक्षांच्या दालनात उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, भाजप शहराध्यक्ष अजय इंगुलकर, सरचिटणीस विकास खुरपडे, विनायक माडपे, परिवहन सभापती किशोर पाटील, नियोजन सभापती प्रतीक्षा रेटरेकर, नगरसेविका अश्विनी अत्रे, नगरसेविका सानिया शेख, उपाध्यक्ष दिलीप पवार, नितेश ठक्कर यांच्यासह अन्य पदाधिकारी आणि प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# महाड रोटरी क्लबतर्फे विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप




**महाड : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ महाड तर्फे गरीब, गरजू, गुणवंत विद्यार्थ्यांना मोफत सायकलींचे वितरण करण्यात आले. ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दररोज शाळेत येण्यासाठी फार मोठी पायपीट करावी लागते. त्यांची अडचण लक्षात घेऊन महाड रोटरी तर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

महाड रोटरी गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात कार्य करीत असताना समाजातील विविध घटकांच्या अडीअडचणी सोडवण्याचे काम करीत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन त्यांचे श्रम आणि वेळ वाचावी तसेच शिक्षण घेण्यास प्रोत्साहन मिळावे या सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून रोटरी क्लब ऑफ महाडने हा उपक्रम राबविला.माजी सेक्रेटरी गुरुपाद कोंडगुळी यांच्या सौजन्याने आणि रोटरी क्लब ऑफ महाड तर्फे चार विद्यार्थ्यांना सायकली देण्यात आल्या.या सुविधेचा योग्य उपयोग करून शिक्षण घ्यावे,

पान १ वरुन

## साऊंड सिस्टीम व्यावसायिकांना नियमांच्या चौकटीत संधी द्यावी

एका व्यावसायिकाच्या माध्यमातून मालक, कामगार, डीजे ऑपरेटर, टेम्पो चालक यांच्यासह सुमारे पाच ते सहा कुटुंबांचा उदरनिर्वाह चालतो. त्यामुळे हा व्यवसाय केवळ मनोरंजन क्षेत्राशी संबंधित नसून अनेक स्थानिक कुटुंबांच्या रोजगाराचे महत्त्वाचे साधन आहे, मात्र सध्या उच्च डेसिबल आवाजाचे कारण देत पोलीस प्रशासनाकडून थेट साहित्य जप्त करणे, मोठ्या प्रमाणात दंड आकारणे तसेच गुन्हे दाखल करण्यासारखी कारवाई केली जात असल्याने स्थानिक व्यावसायिकांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. विशेषतः सण-उत्सवांचा हंगाम हा या व्यावसायिकांसाठी वर्षातील महत्त्वाचा व्यवसायाचा काळ असतो. अशा वेळी होणाऱ्या कारवाईमुळे व्यवसायाचे मोठे नुकसान होत असल्याचे असोसिएशनने निवेदनात नमूद केले आहे.

ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे पालन करणाऱ्या व्यावसायिकांना विनाकारण त्रास होऊ नये यासाठी पोलीस प्रशासनाने संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना योग्य सूचना द्याव्यात तसेच स्थानिक भूमिपुत्र व्यावसायिकांच्या रोजगाराशी संबंधित या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन पोलीस व प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करावी आणि व्यावसायिकांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडे केली.

निवेदन देतेवेळी साऊंड, लाईट, ट्रस्ट, जनरेटर, एलईडी स्क्रीन ओनर्स असोसिएशनचे मंगेश कांडपिळे, सचिन काळे, जतेश म्हात्रे, सुहास सूर्यवंशी, रवी पगडे, महेश ठाकूर, प्रतीक बाणे, अमर पाटील, केतन फडके, शशिकांत मुंडकर, अभिषेक दमडे, कुशल बहिरा, तेजस दळवी आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये साकारणार बहुमजली यांत्रिकी वाहनतळ

प्रभाग समिती ड क्षेत्रातील नवीन पनवेल (प.) शहरातील एचडीएफसी सर्कल ते आदई सर्कल ते अय्यप्पा मंदिर ते अभ्युदय बँक ते एचडीएफसी सर्कल या रस्त्यावर डेकोरेटिव्ह पथदीप खांब उभारून कार्यान्वित करणे या प्रस्तावास, खर्चास व ई-निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता मिळण्याबाबतचा विषय महासभेत मंजूर करण्यात आला.

# अल्पवयीन मुलगी गर्भवती; तरुणाविरोधात गुन्हा दाखल

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली असल्याने संबंधित तरुणावर पोक्सो अंतर्गत पेण पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीला २१ वर्षीय युवकाने प्रेमाच्या जाळ्यात ओढून शारीरिक संबंध प्रस्थापित केल्याने ती गरोदर राहिली. ही माहिती कुटुंबीयांना समजल्या नंतर पेण पोलिसात सोमवारी (ता. १७) गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# आशासेविका, नर्सना साडी वाटप करून सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आरोग्यसेवेचा कणा असलेल्या आशासेविका व नर्स यांच्या कार्याचा गौरव म्हणून नवीन पनवेल येथे झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल आणि कै. नारायण लक्ष्मण तांबोळी सामाजिक संस्था यांच्या वतीने बुधवारी (दि. १९) तालुक्यातील विविध गावांमध्ये कार्यरत असलेल्या १२० आशासेविका व नर्स यांच्यासाठी साडी वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रम दोन टप्प्यांत पार पडला. पहिली बॅच सकाळी ११ ते दुपारी २ आणि दुसरी बॅच दुपारी ३ ते ४ या वेळेत आयोजित करण्यात आली होती. आशासेविका आणि नर्स या आपल्या समाजाच्या आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहेत. गावागावात आणि घराघरात जाऊन नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणे, महिलांना व कुटुंबांना आरोग्यविषयक मार्गदर्शन करणे आणि गरजेच्या वेळी सेवा देणे हे कार्य त्या अत्यंत जबाबदारीने आणि सेवाभावाने करतात.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने लिखिते यांनी आशासेविकांना उपयुक्त आणि मार्गदर्शक प्रशिक्षण दिले. इतरांच्या आरोग्याची काळजी घेत असताना स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे आणि वेळोवेळी स्वतःची आरोग्य तपासणी करून घेणेदेखील तितकेच महत्त्वाचे आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या प्रशिक्षणातून देण्यात आला. समाजाच्या आरोग्यासाठी सातत्याने आणि निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या या सेवाभावी महिलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी साडी वाटपाच्या माध्यमातून हा सन्मान करण्यात आला. उपस्थित राहिलेल्या सर्व १२० आशासेविका व नर्स यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.



# नागोठणे रेल्वे क्रॉसिंग उड्डाणपुलासाठी १००.६६ कोटींचा निधी मंजूर

## खा. सुनील तटकरेंच्या पाठपुराव्याला मोठे यश

**नागोठणे : बातमीदार**

महाराष्ट्र शासनाने राज्यातील रेल्वे क्रॉसिंगमुळे होणारी वाहतूक कोंडी व नागरिकांची गैरसोय दूर करण्यासाठी हाती घेतलेल्या 'रेल्वे क्रॉसिंगमुक्त महाराष्ट्र' या महत्त्वाकांक्षी योजनेत नागोठणे येथील रेल्वे क्रॉसिंग उड्डाणपुलाचा समावेश करण्यात आला आहे. या उड्डाणपुलासाठी तब्बल १००.६६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाल्याने नागोठणे शहर व परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.



रायगडचे खासदार सुनील तटकरे यांच्या विशेष प्रयत्नांमुळे हा महत्त्वपूर्ण निर्णय झाला असून, राज्याच्या महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या सहकार्याने राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते किशोर जैन यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पत्रव्यवहार व पाठपुराव्याला अखेर यश आले आहे.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सुमारे १६० रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपूल उभारण्याचे नियोजन केले आहे. नागोठणे येथील रेल्वे क्रॉसिंगचा या योजनेत समावेश व्हावा, यासाठी खासदार सुनील तटकरे यांनी जुलै २०२६ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पत्रव्यवहार केला होता. या मागणीची मुख्यमंत्री कार्यालयाने तातडीने दखल घेत नागोठणे रेल्वे क्रॉसिंग उड्डाणपुलासाठी १००.६६ कोटी रुपयांच्या निधीच्या मंजुरीसह पुढील कार्यवाही करण्याचे आदेश महारेलच्या व्यवस्थापकीय संचालकांना दिले आहेत.

# हरित माथेरानसाठी व्यापक वृक्षारोपण

**माथेरान : बातमीदार**

पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षसंवर्धन ही काळाची गरज असून केवळ वृक्षारोपण न करता लावलेल्या प्रत्येक वृक्षाचे संगोपन व संवर्धन करणे, ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. या उद्देशाने माथेरानमध्ये शिवसेनेच्या वतीने इंदिरा नगर परिसरात वृक्षारोपण उपक्रम राबवण्यात आला.

पर्यावरण संवेदनशील नागरिक प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मनोज खेडकर यांच्या संकल्पनेतून संपूर्ण माथेरान मध्ये ५०० करंज जातीच्या वृक्षांची लागवड करण्यात येत आहे. या उपक्रमाचा शुभारंभ इंदिरा गांधी नगर येथे करण्यात आला. नगरसेवक केतन रामाणे यांच्या मागणीनुसार या ठिकाणी तब्बल १०० रोपांची लागवड करण्यात आली.

यावेळी माथेरान नगर परिषदेचे गटनेते शिवाजी शिंदे, नगरसेवक सुनील शिंदे, सोहेल महापुळे,वन समिती अध्यक्ष राजेश दळवी, पर्यावरण मित्र राकेश कोकळे,महिला संघटक संगीता जांभळे तसेच नितीन शहा,भास्कर शिंदे यांच्यासह पर्यावरणप्रेमी नागरिक उपस्थित होते. माथेरानला अधिक पर्यावरणपूरक आणि हरित शहर बनवण्यासाठी भविष्यातही अशा उपक्रमांना व्यापक स्वरूप देण्यात येणार आहे.

# विद्यार्थी-पालकांसाठी मार्गदर्शन शिबिर

## श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जे. बी. एस. पी. संस्थेच्या श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालयात गुरुवारी (दि. २०) इयत्ता १० वीतील विद्यार्थ्यांसाठी पालक-विद्यार्थी यांचा मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम रोटरी क्लब पनवेल यांनी विशेषरित्या घेतला होता. कार्यक्रमात जे. बी. एस. पी. संस्थेचे व्हाईस चेरमन वाय. टी. देशमुख, रोटरी क्लब पनवेलचे सेक्रेटरी राजेंद्र कदम. प्रोजेक्ट डायरेक्टर अमर म्हात्रे तसेच सभासद अमोल कामत व सुलोचना म्हात्रे, शाळेचे चेअरमन चंद्रकांत घरत. जे. बी. एस. पी. संस्थेचे एज्युकेशन इन्स्पेक्टर संतोष चव्हाण, मुख्याध्यापिका अनुराधा काठे व इतर मान्यवर उपस्थित होते.






संतोष चव्हाण यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. अमोल कामत यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी आजच्या युगाशी समन्वय साधताना साधनांचा योग्य वापर करून गुणात्मक प्रगती कशी साधावी यावर भर देताना आधुनिक युगाशी सूत्रता व गुणवत्ता यांचे महत्त्व सांगितले. अभ्यास आनंददायी व सोपा कसा होईल यावर त्यांनी मार्गदर्शन केले. रोटरी क्लब पनवेल यांच्या विद्यमाने आयडियल स्टडी ॲप कशा प्रकारे विद्यार्थ्यांना उपयोगी पडू शकते व गुणात्मक प्रगती साधता येईल हेही सांगितले. आयडियल स्टडी ॲपबद्दल बोलताना रोटरी क्लबचे प्रोजेक्ट डायरेक्टर अमर म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना गुणात्मक उद्देश साधताना मनोरंजक पद्धतीने अभ्यास कसा सोपा होईल हेही सांगितले.

जे. बी. एस. पी. संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी अशी साधने कुठेही व कमीत कमी वेळात वापरून जास्त अचूक अभ्यास कसा करता येईल हे सांगितले. त्यामुळे विद्यार्थी व पालक यांच्या आत्मविश्वासात नक्कीच भर पडली. शाळेच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे यांनी शाळेसाठी हा मोफत आयडियल स्टडी ॲप उपलब्ध करून दिल्याबद्दल जे. बी. एस. पी. संस्था व रोटरी क्लब ऑफ पनवेल यांचे मनापासून आभार मानले.

# भाजप ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्षपदी मनोज भुजबळ

**पनवेल : वार्ताहर**

भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांची तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी दूरध्वनीवरून मनोज भुजबळ यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच महापौर नितीन पाटील, प्रभाग समितीचे सभापती अजय बहिरा, भारतीय जनता पार्टी नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे यांनीही त्यांचे अभिनंदन केले.




याशिवाय नगरसेवक महादेव मधे, शशिकांत शेळके आणि निलेश भोईर यांनीदेखील मनोज भुजबळ यांना शुभेच्छा देत पुढील कार्यासाठी आपल्या सदिच्छा व्यक्त केल्या. ओबीसी समाजाच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडण्यासोबतच भारतीय जनता पार्टीची संघटनात्मक ताकद वाढविण्यासाठी मनोज भुजबळ यांचे योगदान महत्त्वाचे ठरणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

दरम्यान, प्रदेश उपाध्यक्षपदाची सलग तिसऱ्यांदा जबाबदारी मिळाल्याने त्यांच्या समर्थक आणि कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

# वशेणीतील वृद्ध महिला बेपत्ता

**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील वशेणी येथील निर्मला कृष्णा म्हात्रे (६७) या महिला १४ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास राहत्या घरातून निघून गेल्या असून आजतागायत परत आल्या नाहीत. नातेवाईक व मित्रमंडळींकडे शोध घेतला असता त्या सापडल्या नाहीत.



रंग गोरा, उंची ५ फूट ६ इंच, सडपातळ बांधा, काळे केस, नेहमी केसांचा आंबाडा बांधते, अंगात नेसू गुलाबी रंगाची साडी व निळ्या रंगाचा ब्लाऊज त्यावर पांढऱ्या रंगाची शाल, चेहऱ्यावर सुरकुत्या पडलेल्या, पाय दुखत असल्याने थोड्याफार लंगडतात. आवाज बारीक आहे, विसरभोळा स्वभाव आणि मराठी बोलणे असे या बेपत्ता महिलेचे वर्णन आहे.

याबाबत सदर महिला हरवल्याची तक्रार करण्यात आली आहे. सदर महिलेचा शोध उरण पोलीस करीत असून उरण पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार रवींद्र ठाकूर याबाबत तपास करीत आहेत.

सदर महिला कोणत्याही ठिकाणी दिसून आल्यास उरण पोलीस ठाणे मो. नं. ८६५५३५४११८, पोलीस हवालदार रवींद्र ठाकूर मो. नं. ८४४६८६३२२० या क्रमांकांवर संपर्क साधण्याचे आवाहन उरण पोलीस ठाण्यातर्फे करण्यात आले आहे.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात महिला आरोग्यावर विशेष मार्गदर्शन

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने महिला विकास कक्ष व कर्मचारी कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. १८) सकाळी ११ वाजता 'एचपीव्ही लसीकरण व गर्भाशयमुखाचा कर्करोग जनजागृती' विषयावर विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.



सत्राला महिला कर्मचारी तसेच विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. मार्गदर्शन सत्रासाठी फोर्टिस हिरानंदानी हॉस्पिटल, वाशी येथील प्रख्यात स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. प्रशांत भामरे विभागप्रमुख व वरिष्ठ सल्लागार तसेच डॉ. सुजय निगुडकर सल्लागार हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. यावेळी तज्ज्ञांनी ह्युमन पॅपिलोमाव्हायरस, त्याचा गर्भाशयमुखाच्या कर्करोगाशी असलेला संबंध, एचपीव्ही लसीकरणाचे महत्त्व, प्रतिबंधात्मक उपाययोजना, नियमित आरोग्य तपासणी आणि आजाराचे लवकर निदान याबाबत सविस्तर माहिती दिली. महिलांनी आपल्या आरोग्याविषयी सजग राहणे, योग्य वेळी वैद्यकीय सल्ला घेणे आणि प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेला प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले.

सत्रादरम्यान विद्यार्थिनी व महिला कर्मचाऱ्यांनी विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून शंकांचे निरसन करून घेतले. एचपीव्ही लसीकरणाबाबत असलेल्या गैरसमजुती दूर करून वैज्ञानिक व वैद्यकीय दृष्टिकोनातून योग्य माहिती उपलब्ध करून देणे या उपक्रमाचा महत्त्वपूर्ण उद्देश ठरला. महिला आरोग्य, सुरक्षितता आणि सर्वांगीण कल्याणाला प्राधान्य देणाऱ्या या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता निर्माण झाली. महिलांमध्ये "प्रतिबंध हाच उपचारापेक्षा अधिक प्रभावी मार्ग" या विचाराची जाणीव निर्माण करण्याच्या दृष्टीने हे सत्र अत्यंत उपयुक्त ठरले.

उपक्रमाचे आयोजन प्रा. रिजवाना मोमीन व प्रा. सोनी पांडे यांनी केले. महिला विकास कक्ष व कर्मचारी कल्याण विभागाच्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. भविष्यातही महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध विषयांवर अशा प्रकारच्या जनजागृतीपर व मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी उपक्रमाचे आयोजन केल्याबद्दल महिला विकास कक्ष व कर्मचारी कल्याण समितीतील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांचे अभिनंदन केले तसेच पुढील उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या.

# गव्हाण विद्यालयातील विद्यार्थ्यांना 'रोटरी'कडून आयडियल स्टडी ॲपची भेट

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या वतीने गुरुवारी (दि. २०) इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना 'आयडियल स्टडी ॲप'चे मोफत इन्स्टॉलेशन करून देण्यात आले. दहावीच्या विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे सुलभीकरण, स्वयं अध्ययनाची सवय आणि बोर्ड परीक्षेच्या तयारीसाठी डिजिटल माध्यम उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.





रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य तथा गव्हाण विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज समितीचे चेअरमन वाय. टी. देशमुख यांच्या माध्यमातून आणि रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या सौजन्याने विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक ॲप उपलब्ध करून देण्यात आले. या ॲपमध्ये इयत्ता दहावीच्या सर्व विषयांचा अभ्यासक्रम मुद्देसूद व घटकनिहाय पद्धतीने देण्यात आला असून पाठ्यपुस्तक नोट्स, स्वाध्याय, महत्त्वाचे प्रश्न, कृतीपत्रिका, बहुपर्यायी प्रश्न आदी अभ्याससाहित्य उपलब्ध आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, सराव आणि स्वयं अध्ययनासाठी या ॲपचा मोठा उपयोग होणार आहे.

यावेळी रोटरी क्लब ऑफ पनवेलचे रोटरियन अमोल कामत यांनी विद्यार्थ्यांना 'आयडियल स्टडी ॲप'चा वापर कसा करावा, त्यातील विविध शैक्षणिक सुविधा कशा वापराव्यात तसेच त्याचा अभ्यासासाठी प्रभावी उपयोग कसा करता येईल याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. चेअरमन वाय. टी. देशमुख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत उपलब्ध करून देण्यात आलेल्या डिजिटल साधनाचा नियमित व योग्य वापर करून दहावीच्या बोर्ड परीक्षेत उत्तम यश संपादन करण्याचे आवाहन केले.

यावेळी रोटरी क्लब ऑफ पनवेलच्या वतीने विद्यालयातील एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेस प्रविष्ट झालेल्या ४० विद्यार्थ्यांना मार्गदर्शक संच उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना देणाऱ्या या उपक्रमाबद्दल विद्यालयाच्या वतीने रोटरी क्लब ऑफ पनवेलचे आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमास रोटरी क्लब ऑफ पनवेलचे रोटरियन राजेंद्र कदम, अमर म्हात्रे, सुलोचना म्हात्रे, अमोल कामत उपस्थित होते. तसेच विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक प्रशांत परदेशी, संदीप भोईर, गीतांजली म्हात्रे, शितलकुमार म्हात्रे, वृषाली म्हात्रे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत विद्यालयाचे उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी उपस्थितांचे आभार मानत विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी रोटरी क्लब ऑफ पनवेलने केलेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. डिजिटल साधनांचा योग्य वापर, नियमित अभ्यास आणि सातत्यपूर्ण सरावातून दहावीच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन करावे हा उपक्रमामागील मुख्य उद्देश असल्याचे विद्यालयाच्या वतीने सांगण्यात आले.

# राष्ट्रीय ग्रंथालय दिनानिमित्त गोखले विधी महाविद्यालयात विविध उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या विधी महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथालय दिन अतिशय उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. ग्रंथालय विज्ञानाचे जनक आणि ग्रंथालय विज्ञानाचे पाच नियम मांडणारे थोर ग्रंथपाल पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १३४व्या जयंतीनिमित्त १२ ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. प्रकाश डोंगरदिवे यांनी डॉ. रंगनाथन यांच्या कार्याचा आणि ग्रंथालय विज्ञानाच्या क्षेत्रातील त्यांच्या भरीव योगदानाचा सविस्तरपणे आढावा घेतला. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग करून ज्ञानसंपादन करणे हीच डॉ. रंगनाथन यांना खरी आदरांजली ठरेल, असे त्यांनी यावेळी प्रकर्षाने नमूद केले.

यावेळी विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २१मधील तरतुदींवर अभ्यासपूर्ण आणि विश्लेषणात्मक भाषणे सादर केली. तसेच ग्रंथ वाचन सत्राअंतर्गत भारतीय संविधानातील विविध अनुच्छेदांच्या तरतुदींवर विद्यार्थ्यांनी आपले विचार आणि भाष्य सादर केले. कार्यक्रमास प्राध्यापक समृद्धी श्रीवास्तव, केवीन टॉरो, राघवेंद्र कोल्लूरकर आणि अनुपम जसवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदर कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी बाबाराव बाराक्षे, संजय खोब्रागडे, संगीता फुलपगार, सय्यद जफर, मानसी घरत, श्रीनिवास राव आणि कुलदीप सिंग यांनी विशेष असे योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना पाटील यांनी, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रकाश डोंगरदिवे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात करिअर मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य विज्ञान महाविद्यालयात मंगळवारी (दि. १८) सकाळी ११ वाजता वाणिज्य संघटनेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'करिअर मार्गदर्शन व आर्थिक साक्षरता' विषयावर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.



स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांनी आपल्या आवडी, कौशल्ये आणि क्षमतांचा योग्य विचार करून करिअरची दिशा निश्चित करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक नियोजन, बचत, गुंतवणूक, आर्थिक शिस्त आणि उपलब्ध आर्थिक संधी याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण होणे गरजेचे आहे. या उद्देशाने या मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले. सत्रामध्ये विद्यार्थ्यांना विविध करिअरच्या संधी, उच्च शिक्षणाचे पर्याय, रोजगाराच्या बदलत्या संधी, आवश्यक कौशल्ये आणि व्यक्तिमत्त्व विकास याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

त्याचबरोबर आर्थिक साक्षरतेचे महत्त्व, उत्पन्नाचे योग्य नियोजन, बचतीची सवय, गुंतवणुकीची मूलभूत तत्त्वे आणि आर्थिक निर्णय घेताना आवश्यक असलेली दक्षता याविषयीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. या सत्रामुळे विद्यार्थ्यांना करिअर निवडीबाबत योग्य दृष्टिकोन विकसित करण्यास तसेच आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि जबाबदार नागरिक बनण्यासाठी आवश्यक ज्ञान प्राप्त करण्यास मदत झाली. विद्यार्थ्यांनी सत्राला उत्स्फूर्त प्रतिसाद देत विविध प्रश्न विचारून तज्ज्ञांकडून मार्गदर्शन घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे, डॉ. प्रवर शर्मा व प्रा. विशाल देशमुख, प्राध्यापकवर्ग आणि विद्यार्थ्यांनी विशेष सहकार्य केले.



**खारघर :** भाजप उत्तर रायगड जिल्हा सचिव शुभ सोमनाथ पाटील यांच्या वास्तुशांतीनिमित्त राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांचा सन्मान करण्यात आला.



**पनवेल :** भाजप युवा कार्यकर्ते रहीम लदाप यांना वाढदिवसानिमित्त राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या.

## संपादकीय

# ग्राहकहिताचा समतोल

ऊर्जा आत्मनिर्भरतेचा भारताचा प्रवास थांबवणे हा उपाय असू शकत नाही. संबंधित धोरणाला अधिक लवचिक आणि ग्राहकाभिमुख बनवणे हा सुयोग्य मार्ग आहे. ई-२० असो किंवा गरजेनुसार ई-१०चा पर्याय, धोरणाची अंतिम कसोटी देशहित, शेतकरीहित आणि ग्राहकहित यांचा समतोल राखणे हीच असली पाहिजे.

**देशाच्या ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने इथेनॉलमिश्रित पेट्रोलचे धोरण हे केंद्रातील मोदी सरकारच्या महत्त्वाच्या निर्णयांपैकी एक आहे. आयात केलेल्या कच्च्या तेलावरील अवलंबित्व कमी करणे, परकीय चलनाची बचत करणे, कार्बन उत्सर्जन कमी करून प्रदूषण घटवणे आणि शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त बाजारपेठ निर्माण करणे अशी अनेक उद्दिष्टे त्यामागे आहेत. भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेच्या दीर्घकालीन वाटचालीचा हे धोरण एक भाग आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार व्ही. अनंत नागेश्वरन यांनी अलीकडेच ई-२० बरोबरच ई-१० सारख्या कमी इथेनॉलमिश्रणाच्या पेट्रोलचा पर्याय ग्राहकांना उपलब्ध करून देण्याची भूमिका मांडली. जुन्या वाहनांच्या मालकांची चिंता दूर करण्यासाठी असा पर्याय उपयुक्त ठरू शकतो असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. अर्थात या सूचनेचा अर्थ सरकारने ई-२० धोरणाचा त्याग केला असा अजिबात होत नाही. केंद्र सरकार आणि संबंधित उद्योगक्षेत्रांच्या प्रतिनिधींमध्ये ई-२० बरोबर ई-१०चा पर्याय पुन्हा उपलब्ध करून देण्याच्या व्यवहार्यतेबाबत प्राथमिक चर्चा सुरू झाली आहे. मात्र यासंदर्भात अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. अशा पर्यायाच्या तांत्रिक व अंमलबजावणीसंबंधी अडचणीही व्यक्त केल्या गेल्या आहेत. त्यामुळे निव्वळ या चर्चेच्या आधारे कुणी त्यास 'सरकारचा यू-टर्न' म्हणत असेल तर ते वस्तुस्थितीचा विपर्यास करणारे म्हणावे लागेल. मोदी सरकारच्या इथेनॉल धोरणाने आपल्या ठरलेल्या उद्दिष्टांची पूर्तता केली आहे. दहा टक्के मिश्रणाचे लक्ष्य मुदतीच्या पाच महिने आधी गाठण्यात आले. त्यानंतर मिश्रणाचे प्रमाण वाढत गेले आणि वीस टयांचे लक्ष्यही निर्धारित कालावधीच्या आधी साध्य झाले. केंद्राच्या आकडेवारीनुसार इथेनॉलमिश्रित पेट्रोल कार्यक्रमामुळे आतापर्यंत सुमारे १.९७ लाख कोटी रुपयांची परकीय चलन बचत झाली आहे. हे धोरण राबवले नसते तर आणखी जवळपास ३१६ लाख टन कच्च्या तेलाची आयात करणे भाग पडले असते. कार्बन उत्सर्जनात सुमारे ९५२ लाख टनाची घट झाली आहे. शेतकरी व संबंधितांना या कार्यक्रमातून १.६६ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम हस्तांतरित झाली आहे. ई-२०मुळे वाहनांच्या इंजिनांचे मोठे नुकसान होते या भीतीला खरे तर कोणताही वास्तव आधार नाही. व्यापक चाचण्यांमधून ई-२०सुसंगत वाहनांच्या कार्यक्षमतेबाबत आणि दीर्घकालीन इंजिन आरोग्याबाबत कठोर परीक्षण केले गेले आहे. ई-२०चा अवलंब टप्प्याटप्प्याने, वाहनउत्पादक, तेल कंपन्या आणि अन्य तज्ज्ञांच्या सल्ल्याने केल्याचे केंद्र सरकारने यापूर्वी अनेकदा स्पष्ट केले आहे. परंतु लोकशाही व्यवस्थेत एखाद्या धोरणाचे यश केवळ आकडेवारीत मोजले जात नसते. नागरिकांच्या प्रत्यक्ष अनुभवाला देखील महत्त्व दिले जाते. त्यामुळेच जुन्या वाहनधारकांना जर काही अडचणी जाणवत असतील तर ई-१०सारखा मर्यादित पर्याय उपलब्ध करून देण्याच्या शक्यतेचा विचार करणे हे धोरणात्मक संवेदनशीलतेचे आणि व्यावहारिकतेचे लक्षण म्हटले पाहिजे. मोदी सरकारने इथेनॉलच्या बाबतीत दाखवलेली दूरदृष्टी कायम ठेवत बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या धोरणात आवश्यक सुधारणा करण्याची तयारी दाखवली तर ही धोरणात्मक परिपक्वता भारताच्या ऊर्जा आत्मनिर्भरतेला आणखी बळच देईल.**


# एक रील मातीसाठी, पाण्यासाठी, सुरक्षित भविष्यासाठी!

माती आणि पाणी ही केवळ नैसर्गिक संसाधने नाहीत, तर मानवी जीवनाच्या अस्तित्वाचा आणि शाश्वत विकासाचा मूलभूत आधार आहेत. सुपीक मातीचे संवर्धन आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर ही आजच्या काळाची गरज बनली आहे. बदलते हवामान, अनियमित पर्जन्यमान, जमिनीची धूप आणि भूजल पातळीतील घट या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर मृद व जलसंधारणाचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. याच उद्देशाने महाराष्ट्र शासनाच्या मृद व जलसंधारण विभागाने युवकांच्या कल्पकतेला डिजिटल माध्यमाची जोड देत 'रील फॉर सॉईल अँड वॉटर कन्झर्वेशन' या अभिनव राज्यव्यापी स्पर्धेचे आयोजन केले आहे.

माजी मुख्यमंत्री दिवंगत सुधाकरराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी २१ ऑगस्ट रोजी राज्यात 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येतो. यंदा १५ ते २१ ऑगस्ट २०२६ या कालावधीत 'जलसंधारण सप्ताह' साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त राज्यभर 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर', जलसंधारणाची शपथ आणि जनजागृतीपर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

या उपक्रमांना नव्या पिढीच्या सहभागाची जोड देण्यासाठी 'रील फॉर सॉईल अँड वॉटर कन्झर्वेशन' स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. आजच्या युवकांसाठी Instagram सारखी समाजमाध्यमे अभिव्यक्तीचे प्रभावी व्यासपीठ बनली आहेत. त्याच माध्यमाचा सकारात्मक आणि समाजोपयोगी वापर करून माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

महाराष्ट्रातील १५ ते ३० वयोगटातील युवक-युवतींना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धकांनी मृद व जलसंधारणाशी संबंधित विषयावर ३० ते ६० सेकंदांची Instagram Reel तयार करायची आहे. रीलच्या सुरुवातीला तिचा उद्देश, स्पर्धकाचे संपूर्ण नाव आणि जिल्ह्याचे नाव नमूद करणे आवश्यक आहे. तयार केलेली रील स्वतःच्या Public Instagram Account वर पोस्ट करून मृद व जलसंधारण विभागाच्या




अधिकृत Instagram Account ला Tag करणे आवश्यक आहे. त्यासोबत #SaveSoilSaveWater हा अधिकृत हॅशटॅग वापरणे अनिवार्य आहे.

माती संवर्धन आणि पाणी बचत या संकल्पनेला विविध अंगांनी मांडण्याची संधी या स्पर्धेत युवकांना मिळणार आहे. मृदसंधारण, जलसंधारण, मातीची धूप रोखणे, पावसाच्या पाण्याचे संकलन, शेततळे, बंधारे, पाणलोट क्षेत्र विकास, वृक्षारोपण, पर्यावरण संरक्षण, गावातील यशस्वी मृद व जलसंधारण कामे, पारंपरिक संवर्धन पद्धती तसेच माती व पाणी वाचविण्याच्या नाविन्यपूर्ण कल्पना अशा विविध विषयांवर रील तयार करता येईल.

यामुळे केवळ स्पर्धाच होणार नाही, तर राज्यातील विविध भागांत राबविण्यात आलेली यशस्वी कामे, स्थानिक प्रयोग आणि पारंपरिक ज्ञानदेखील डिजिटल माध्यमातून समाजासमोर येण्यास मदत होणार आहे. सोशल मीडियावरील स्पर्धा म्हटली की Likes आणि Followers यांना अधिक महत्त्व दिले जाते. मात्र या स्पर्धेत आशय, कल्पकता आणि सामाजिक संदेशाला प्राधान्य देण्यात आले आहे. स्पर्धेचे मूल्यमापन एकूण १०० गुणांमध्ये करण्यात येणार आहे. विषय व संदेशासाठी ३० गुण, कल्पकतेसाठी २५ गुण, प्रभावी सामाजिक संदेशासाठी २० गुण, सादरीकरण व तांत्रिक गुणवत्तेसाठी १५ गुण आणि Instagram Engagement साठी १० गुण निश्चित करण्यात आले आहेत.

त्यामुळे केवळ Likes किंवा Followers च्या संख्येवर विजेता ठरणार नाही. तज्ज्ञ परीक्षण आणि Social Media Engagement यांचा समतोल साधून गुणवत्तापूर्ण रील्सची निवड केली जाणार आहे. युवकांच्या सहभागाला प्रोत्साहन देण्यासाठी जिल्हास्तरावर आकर्षक पुरस्कार प्रस्तावित करण्यात आले आहेत. प्रथम क्रमांकासाठी २५ हजार रुपये व गौरवचिन्ह, द्वितीय क्रमांकासाठी १५ हजार रुपये व गौरवचिन्ह, तर तृतीय क्रमांकासाठी १० हजार रुपये व गौरवचिन्ह प्रस्तावित आहे. पात्र सहभागींना ई-प्रमाणपत्र देण्यात येणार असून विजेत्यांना विशेष 'युवा मृद-जलदूत' म्हणून गौरविण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यातून किमान २५० रील्स आणि संपूर्ण राज्यातून १० हजार रील्सचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. हजारो युवकांनी या उपक्रमात सहभाग घेतल्यास समाजमाध्यमांद्वारे लाखो नागरिकांपर्यंत माती आणि पाणी संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे पोहोचू शकतो.

पाण्याचा प्रत्येक थेंब आणि मातीचा प्रत्येक कण भावी पिढ्यांसाठी जपणे ही सामूहिक जबाबदारी आहे. शासनाच्या योजना आणि जलसंधारणाची कामे यांना लोकसहभागाची जोड मिळाल्यास त्यांचे परिणाम अधिक व्यापक आणि शाश्वत होऊ शकतात. विशेषतः युवकांनी या चळवळीचे दूत बनणे ही काळाची गरज आहे.

मोबाइलच्या पडद्यावर काही सेकंद दिसणारी एखादी कल्पक रील एखाद्या व्यक्तीला पाणी वाचविण्यास, पावसाचे पाणी साठविण्यास, वृक्ष लावण्यास किंवा आपल्या गावातील जलसंधारणाच्या कामात सहभागी होण्यास प्रेरित करू शकते. त्यामुळे ही स्पर्धा केवळ डिजिटल कंटेंट निर्मितीपुरती मर्यादित नसून 'डिजिटल जनजागृतीतून प्रत्यक्ष लोकसहभागाकडे' नेणारा अभिनव प्रयत्न आहे.

"एक Reel मातीसाठी! एक Reel पाण्यासाठी! एक Reel सुरक्षित भविष्यासाठी!" या संदेशातून युवकांनी आपल्या कल्पकतेला समाजहिताची दिशा देत माती आणि पाण्याच्या संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा. कारण आज वाचवलेली माती आणि पाणी हेच उद्याच्या समृद्ध, सक्षम आणि जलसुरक्षित महाराष्ट्राचे भक्कम अधिष्ठान ठरणार आहे.

या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये लोकसहभागातून झालेली पाणलोट विकासाची कामे, गावांनी स्वबळावर उभी केलेली जलसंधारणाची मॉडेल्स आणि शेतकऱ्यांनी राबवलेले नाविन्यपूर्ण प्रयोग डिजिटल माध्यमातून समोर येणार आहेत. एका छोट्या रीलच्या माध्यमातून दुसऱ्या गावाला प्रेरणा मिळू शकते आणि चांगल्या कामाची साखळी तयार होऊ शकते, हा या उपक्रमामागील महत्वाचा उद्देश आहे.

आज प्रत्येकाने आपल्या परीने पाण्याचा काटकसरीने वापर करणे, घराच्या छतावरील पावसाचे पाणी जमिनीत जिरवणे आणि मातीची धूप रोखण्यासाठी वृक्षारोपण करणे या छोट्या कृतींमधून मोठा बदल घडू शकतो. ही स्पर्धा युवकांना केवळ स्पर्धक म्हणून नाही तर आपल्या गावाचे आणि महाराष्ट्राचे जलदूत म्हणून पुढे आणणारी ठरणार आहे. म्हणूनच शासनाने दिलेला संदेश स्पष्ट आहे, एक रील मातीसाठी, एक रील पाण्यासाठी आणि एक रील सुरक्षित भविष्यासाठी. आज जपलेला मातीचा प्रत्येक कण आणि पाण्याचा प्रत्येक थेंब हाच उद्याच्या समृद्ध आणि जलसुरक्षित महाराष्ट्राचा मजबूत पाया ठरणार आहे.

या उपक्रमाचे खरे यश हे केवळ बक्षिसांपुरते मर्यादित नसून ते लोकांच्या मनात निर्माण होणाऱ्या जाणीवेत आहे. जेव्हा एखादा युवक आपल्या शेतातील शेततळ्याची, गावातील दुरुस्त केलेल्या बंधाऱ्याची किंवा नव्याने लावलेल्या झाडांची गोष्ट रीलमधून सांगतो, तेव्हा ती गोष्ट केवळ व्हिडिओ राहत नाही तर ती इतरांसाठी प्रेरणा बनते. महाराष्ट्रात अनेक गावांनी जलसंधारणाच्या माध्यमातून आपले चित्र बदलले आहे, त्या यशोगाथा या डिजिटल माध्यमातून राज्यभर पोहोचणार आहेत. मोबाइलच्या स्क्रीनवर काही सेकंदांसाठी दिसणारी ही कल्पकता एखाद्याला पाणी वाचवण्यास, पावसाचे पाणी अडवण्यास आणि मातीचे संवर्धन करण्यास प्रवृत्त करू शकते. त्यामुळे ही स्पर्धा म्हणजे केवळ रील बनवण्याची स्पर्धा नसून ती डिजिटल माध्यमातून प्रत्यक्ष कृतीकडे नेणारी एक सकारात्मक लोकचळवळ आहे, जी युवकांना आपल्या भविष्याचा जलदूत बनवेल.

**-संकलन, जिल्हा माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर**

## बदलते तंत्रज्ञान

# फोन नीट धरा; अन्यथा करंगळी होईल वाकडी!

तुम्ही मोबाइल करंगळीने म्हणजेच हाताच्या सर्वांत लहान बोटावर धरत असाल तर काळजी घ्या. तुम्ही पिंकी, कार्पल टनल आणि क्युबाइटल टनल सिंड्रोमचे बळी ठरू शकता. यामुळे, बोटांची आणि हातांची रचना विकृत होऊ शकते. याने मेंदूशी संबंधित नसांवरही परिणाम होऊ शकतो. जबलपूरच्या नेताजी सुभाषचंद्र बोस मेडिकल कॉलेज हॉस्पिटलमध्ये अशी प्रकरणे नोंदवली गेली आहेत. मोबाइलची सवय अनेकांना लागली असून, याचा नकारात्मक परिणाम प्रत्येकाच्या शरीरावर होताना दिसत असल्याचे आतापर्यंतच्या अनेक अहवालांतून समोर आले आहे. जवळपास आता सर्वांच्याच हातात स्मार्टफोन आले आहेत, मात्र हा स्मार्टफोन आपण कसा हातात पकडतो यावर आपल्या हाताचे आरोग्य अवलंबून असल्याचे आता निदर्शनास आले आहे. याबद्दल फिजिओथेरपिस्ट डॉ. अजय फौजदार यांनी माहिती दिली आहे.



**केस १ : हात सुन्न पडतो**

कंपनीत काम करणारा तरुण (२५) सर्व कामे फोनद्वारे करतो. करंगळीवर फोन धरण्याची त्याला सवय झाली. त्यामुळे हात सुन्न पडायला सुरुवात झाली. मानेपासून पाठीपर्यंत वेदना सुरू झाल्या.

**केस २ : करंगळीवर पडला खड्डा**

१८ वर्षीय तरुणी करंगळीवर फोन ठेवून फोन वापरतो. यामुळे बोटांचे स्नायू कमकुवत झाले. करंगळीत वेदना होत होत्या. सतत करंगळीवर फोन पकडल्याने करंगळीवर खड्डा पडला.


**काय होते?**

प्रथम करंगळी वाकडी होण्यास सुरुवात होते. दुसरा टप्पा कार्पल टनल सिंड्रोम असतो. यात तळहात आणि मनगटावर वेदना निर्माण होतात. तिसरा टप्पा क्यूबाइटल सिंड्रोम धोकादायक आहे. यामध्ये बोटांवर ताण आल्याने हाताच्या संरचनेवर परिणाम होऊन स्नायू व मज्जातंतूंवर परिणाम होतो.

**मोबाइलचे वजन किती?**

सामान्य वजन ११३ ते १९८ ग्रॅम, सरासरी वजन १९९ ते ३०० ग्रॅम, अधिक वजन ३०१ ग्रॅमपेक्षा, कव्हरचे वजन ५० ते २५० ग्रॅम. मोबाइल करंगळीने जास्त वेळ धरून ठेवल्याने पिंकी, कार्पल टनल व क्यूबाइटल टनल सिंड्रोम होतो. वेदना कोपरपासून मानेपर्यंत पसरते. न्यूरोलॉजिकल आजाराचा धोकादेखील असतो.

# विनोदी अभिनेते शरद तळवलकर



## निमित्त

शरद तळवलकर हे मराठी चित्रपटांतील अभिनेते होते. आज त्यांचा स्मृतीदिन आहे. पु.ल. देशपांडे यांनी शरद तळवलकरांच्या अभिनयाचे मार्मिक वर्णन करून ठेवले आहे. ते म्हणतात, अभिनयातील सहजता हा दुर्मीळ गुण शरदमध्ये आहे. आपलं बोलणं विनोदी करायला त्याला कसलीही युक्ती वापरावी लागत नाही. नाटककाराने लिहिलेला संवाद पुरेसा हशा पिकवणारा नाही, या समजुतीने काही विनोदी नट आपली विनोदबुद्धी वापरतात, नको त्या ठिकाणी नको इतके अंगविक्षेप करतात. हशा पिकवण्यासाठी शरदला यापैकी कशाचीच गरज भासली नाही.

शरद गणेश तळवलकर यांचा जन्म नगर जिल्ह्यातील बोधेगाव येथे झाला. त्यांचे शालेय शिक्षण पुण्याच्या भावे हायस्कूलमधून झाले. शाळेत असताना ते शिक्षकांच्या नकला हुबेहूब करायचे. १९३५ साली 'रणदुंदुभी' नाटकात शिशुपालाची भूमिका करणारा कलाकार ऐन वेळी अडला आणि शरद तळवलकरांनी आपल्या अभिजात कलागुणांनी त्या भूमिकेत कमालीचा रंग भरला. तेव्हापासून दर वर्षी स्नेहसंमेलनाच्या नाटकात त्यांच्यासाठी आग्रह धरला जाऊ लागला. नटश्रेष्ठ केशवराव दाते यांच्या पाहण्यात त्यातील एक भूमिका आली आणि त्यांच्या 'नाट्य विकास' संस्थेत त्यांनी तळवलकरांना निमंत्रण दिले. नाटकात कामे करणे ही त्या काळात फारशी समाजमान्य गोष्ट नव्हती. वडिलांनी नाटक कंपनीत जाण्यास विरोध केल्यानंतर नाटकाच्या वेडापायी शरद तळवलकरांनी घर सोडले.

अभिनय मार्गदर्शनासाठी तळवलकर कोल्हापूरला मा. विनायक यांच्या 'हंस पिक्चर्स'मध्ये बाबूराव पेंढारकरांना भेटले. त्यांच्या सल्ल्यानुसार त्यांनी आधी शिक्षण पूर्ण करायचे ठरवून जोडीला अकाऊंटंटची नोकरी पत्करली. व्यावसायिक नाटकांतून भादव्या, फाल्गुनराव, कामण्णा, तळीराम, धैर्यधर अशा भूमिका शरद तळवलकर करू लागले. १९५२ साली गाजलेल्या 'पेडगावचे शहाणे' आणि 'लाखाची गोष्ट' या राजा परांजपे दिग्दर्शित चित्रपटांत त्यांना छोट्या भूमिका मिळाल्या. तसेच, दत्ता धर्माधिकारी यांच्या 'अखेर जमलं' या चित्रपटात लक्षात राहण्याजोगी भूमिका मिळाली.

१९५५ साली आलेल्या 'करायला गेलो एक' या तुफान विनोदी फार्सने शरद तळवलकरांचे नाव महाराष्ट्रभर केले. तेथून त्यांची यशस्वी वाटचाल सुरू झाली. अभिनयाच्या वेडापायी त्यांनी पुणे विद्यापीठातील नोकरीही सोडली. पुढे राजा गोसावी यांच्याबरोबर 'अवघाची संसार', 'दोन घडीचा डाव' आणि 'याला जीवन ऐसे नाव' हे त्यांचे चित्रपट गाजले. 'रंगल्या रात्री अशा' (१९६२) या चित्रपटात शरद तळवलकरांना आव्हानात्मक भूमिका मिळाली. 'बायको माहेरी जाते' या चित्रपटातील त्यांची विनोदी भूमिकाही गाजली. अत्यंत सहज आणि उत्स्फूर्त अभिनय हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

दरम्यान, शरद तळवलकर यांनी १९५१ साली कारवारला व्यावसायिक रंगभूमीवर 'संशयकल्लोळ'मधील सुभानराव सर्वप्रथम केला. 'अपराध मीच केला'मधील गोके मास्तर, 'दिवा जळू दे सारी रात'मधील पोस्ट मास्तर, या व्यक्तिरेखांबरोबरच 'एकच प्याला', 'भावबंधन', 'घरोघरी हीच बोंब', 'आप्पाजींची सेक्रेटरी' या नाटकांतील त्यांच्या भूमिकाही गाजल्या. असा हा चतुरस्र कलावंत अखेरपर्यंत रंगभूमीवर कार्यरत राहिला. 'डार्लिंग डार्लिंग', 'सखी शेजारिणी' आदी नाटकांचे प्रयोग सुरू असतानाच अखेरचा श्वास घेतला. २१ ऑगस्ट २००१ मध्ये त्यांचे निधन झाले. विनोदाच्या आणि सहजसुंदर अभिनयाच्या प्रवासाला पूर्णविराम मिळाला.

**-अभिजित पेंढारकर**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# 'ही' आयुर्वेदिक वनस्पती चघळा, मधुमेहावर रामबाण

भारत हा मधुमेहाची राजधानी होणार आहे. एका सर्व्हेक्षणात भारतातील ४० वर्षांवरील व्यक्ती ही लठ्ठपणाची शिकार झाली आहे. त्यामुळे ब्लड प्रेशर आणि डायबिटीसमुळे अनेक जण आजारी आहेत. प्रत्येक व्यक्तीची प्रकृती एकसारखी नसते. डायबिटीजमुळे पिडीत व्यक्तीचा आहार देखील एक सारखा नसतो. डायबिटीज कंट्रोल करण्यासाठी शरीराला एक्टीव्ह ठेवणे गरजेचे असते, परंतू आयुर्वेदिक वनस्पतीमुळे शरीरातील शुगर कंट्रोल ठेवणे सोपे जाते. ज्येष्ठमधाची कांडी यासाठी रामबाण ठरू शकते. यात एंटीऑक्सीडेंट्स आणि पोषक तत्वे भरपूर असतात. चला तर पाहूयात ब्लड शुगर कंट्रोल ठेवण्यासाठी ज्येष्ठमधाच्या काड्या कशा फायदेशीर ठरतात.



**डायबिटीज रोखण्यासाठी ज्येष्ठमध (मुलेठी) फायदेशीर का आहे?**

शरीरात ब्लड शुगर कंट्रोल करण्यासाठी ज्येष्ठमध खूप महत्वाचे आहे. वास्तविक ज्येष्ठमधात एंटीऑक्सीडेंट्स भरपूर असते. डायबिटीज दरम्यान होणाऱ्या समस्या कमी करण्यासाठी ज्येष्ठमध वनस्पती खूप फायद्याची आहे. काही संशोधनानूसार ज्येष्ठमधाच्या काड्यांचे सेवन केल्याने सारखी सारखी साखर खाण्याची इच्छा कंट्रोल होते.

**कसे सेवन करावे?**

ज्येष्ठमधाच्या (मुलेठी) ब्लड शुगर लेव्हल काही प्रमाणात कमी होऊ शकते. तुम्ही रात्री झोपण्यापूर्वी तोंडात ज्येष्ठमधाच्या काड्या ठेवाव्यात. ज्येष्ठमधाच्या काड्यामुळे तुम्हाला साखर खाण्याची इच्छा होत नाही.

**ज्येष्ठमधाचा चहा**

ज्येष्ठमधाच्या चहा तयार करण्यासाठी १ कप पाणी घ्यावे, त्यात २ ते ३ ज्येष्ठमधाच्या काड्या टाकून चहा बनवावा. नंतर गाळून हा चहा घ्यावा त्याने ब्लड शुगरची लेव्हल कमी होईल

**ज्येष्ठमध (मुलेठी)**

एक बारमाही मिळणारे वनऔषधी आहे. याचे मूळ दक्षिण युरोप आणि पश्चिम आशियामध्ये आहे. वनस्पतीचे इंग्रजी नाव Glycyrrhiza glabra आहे. त्याचा ग्रीक भाषेतील अर्थ Glykys (गोड) आणि Rrhiza (रूट) या दोन शब्दांपासून बनलेला आहे.

**(ही माहिती सर्वसामान्य ज्ञानावर आधारीत आहे. अधिक माहितीसाठी तुमच्या फॅमिली डॉक्टरांशी संपर्क करावा.)**

# माणगावचे पाणीपुरवठा आणि आरोग्य कार्यालयच पाण्यात!

## पंचायत समितीची जुनी इमारत धोकादायक

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील विविध गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाच्या उपअभियंता कार्यालयासह तालुका सार्वजनिक आरोग्य विभागाचे कार्यालय सध्या अक्षरशः पाण्याच्या विळख्यात सापडले आहे. जुन्या पंचायत समितीच्या आवारातील या इमारतीभोवती पावसाचे पाणी साचत असल्याने नागरिक आणि कर्मचाऱ्यांना चिखल-पाण्यातून वाट काढत कार्यालयात जावे लागत आहे. वर्षानुवर्षे ही समस्या कायम असूनही संबंधित वरिष्ठ अधिकारी आणि प्रशासनाचे त्याकडे गांभीर्याने लक्ष नसल्याने संताप व्यक्त होत आहे.



जुन्या पंचायत समितीची ही इमारत आधीच जीर्ण आणि मोडकळीस आलेल्या अवस्थेत आहे. त्यातच आवारात पावसाच्या पाण्याचा निचरा होण्यासाठी प्रभावी व्यवस्था नसल्याने पाणी मोठ्या प्रमाणात तुंबते. अनेक दिवस पाणी साचून राहिल्यामुळे सर्वत्र दुर्गंधी, अस्वच्छता आणि डासांचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे आरोग्य विभागाचे कार्यालयच अशा अस्वच्छ आणि आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या वातावरणात सुरू असल्याने कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे

याच परिसरातील स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकालाही पाण्याने वेढले आहे. स्वातंत्र्य दिनाच्या दिवशीही या स्मारक परिसरात पाणी साचलेले असताना ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पडला. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान देणाऱ्या स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मारकाची अशी अवस्था असणे ही प्रशासनासाठी गंभीर बाब असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

या परिसरातील इतर शासकीय इमारतींची अवस्थाही चिंताजनक आहे. सर्व शिक्षा अभियानाची इमारत गळकी आणि धोकादायक झाली असून, वापराविना पडून असलेल्या इमारतींची देखभाल होत नसल्याने त्या हळूहळू भूतबंगल्याचे स्वरूप धारण करीत आहेत. शासनाच्या निधीतून उभारलेल्या या इमारतींचा योग्य वापर न झाल्याने लाखो-कोट्यवधी रुपयांची सार्वजनिक मालमत्ता अक्षरशः वाया जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

कार्यालय परिसरात अनधिकृतपणे उभी केली जाणारी वाहने, वाढलेली झाडे-झुडपे आणि अस्वच्छतेमुळे संपूर्ण परिसराचा बकालपणा वाढला आहे. उघड्यावरच मुतारीचा वापर होत असल्याने दुर्गंधी आणि अस्वच्छतेत आणखी भर पडत आहे. शासकीय कार्यालयांच्या परिसराची अशी अवस्था असताना स्वच्छता आणि सुरक्षिततेचे नियम नेमके कोणासाठी, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

## जिल्ह्यात १२ सप्टेंबरला राष्ट्रीय लोक अदालत

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण आणि उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशावरून, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड-अलिबाग यांच्या मार्गदर्शनात संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये दि.१२ सप्टेंबर २०२६ रोजी राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले असून या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे आणि या लोक अदालतीचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, रायगड अलिबाग एस.बी.अग्रवाल यांनी केले आहे.

या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील सर्व न्यायालयात प्रलंबित असलेली दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, दिवाणी व तडजोडपात्र फौजदारी अपिले, मोटार अपघात प्रकरणे, विवाह विषयक प्रलंबित प्रकरणे तसेच ग्रामपंचायत यांच्याकडील घरपट्टी, पाणीपट्टी बिलाच्या देयकाबाबतची वादपूर्व प्रकरणे, भारत दूर संचार निगम लिमिटेड, विजवितरण, राष्ट्रीयकृत बँका आणि पतसंस्था व इतर वित्तीय संस्था यांच्याकडील थकबाकीबाबतची वादपूर्व प्रकरणे या लोक अदालतीमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात येतात.

लोकअदालतीचे फायदे पक्षकारांना कोणत्याही प्रकारची फी भरावी लागणार नाही. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरूध्द अपील नाही. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणे लोकन्यायालयात होणाऱ्या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते. खटल्यांमध्ये साक्षी-पुरावा, उलटतपासणी, दिर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.

## कारमेल येथे नशामुक्त विद्यालय अभियानास प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना अमली पदार्थांच्या विळख्यापासून दूर ठेवत त्यांच्यामध्ये निरोगी आणि व्यसनमुक्त जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने कारमेल हायस्कूलमध्ये 'नशामुक्त विद्यालय अभियान' उत्साहात राबविण्यात आले. या अभियानाला विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमाला पेण नगरपरिषदेचे नगरसेवक निळकंठ म्हात्रे, पेण पोलीस ठाण्याचे पोलीस सहकारी किशोर घरत, पोलीस राम सूर्यवंशी तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर साफल्या यांची प्रमुख उपस्थिती होती. इयत्ता नववीच्या विद्यार्थ्यांसह शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी या अभियानात सक्रिय सहभाग घेतला.

यावेळी विद्यार्थ्यांना अमली पदार्थांचे सेवन आणि विविध प्रकारच्या व्यसनांमुळे शारीरिक व मानसिक आरोग्यावर होणारे गंभीर दुष्परिणाम, तसेच त्याचा शिक्षण, कौटुंबिक जीवन आणि सामाजिक जीवनावर होणारा विपरीत परिणाम याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.


Khandare Saheb Court

Adv. Irshad R. Shaikh
Adv. For Applicant
Next Date: 29/9/2026
Exh7/D

**PUBLIC NOTICE**

**IN THE COURT OF CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL, AT PANVEL**

CIVIL MISC. APPLICATION NO.1316 OF 2026

1. Ms. Kalyani Adimurti Rapeti
2. Smt. Sharadha Adimurti Rapeti
3. Mr. Kamleshwar Adimurti Rapet .... Applicant

V/s.

NIL .....Non Applicant

It is hereby informed to the public at large that **Late Shri. Adimurti Rapeti** ('Deceased') who is the husband of Applicant no. 2 and father of Applicant no. 1 and 3, has died on dated 27/07/2024 at Mahatma Gandhi Mission's Trust Hospital, Sector 4, Vashi. That the Deceased died intestate and at the time of his death he was the owner of the following properties:

A) Owner of Flat no. A-201, area admeasuring 57.041 sq.mtrs. builtup, A Wing, Manomay, Plot No. 01, Sector 35D, Kharghar, Navi Mumbai, Tal- Panvel, Dist. Raigarh -410210

That consequent on the death of the Deceased, applicants being the sole legal heirs and/or the legal representatives of the Deceased as per the Hindu Succession Act 1956 has filed application u/s 2 of the Bombay Regulation Act No. VIII of 1827 for being declared as the legal heirs of the Deceased in respect of the abovesaid property.

Anybody having any claim, objection against, in, to or upon the above said property, or the applicants being declared as the legal heirs of the Deceased in respect of the abovesaid property shall notify the same in writing within 30 days from the date hereof along with the supporting documentary evidence to the Hon'ble Court, failing which the Heirship, Certificate will be issued in accordance with law.

**Date: 18/08/2026**
**Place: panvel**

Court Stamp

**sd/-**
**Asst Superintendent**
**Civil Judge (SD) Panvel**


## आरसीएफ थळ युनिटमध्ये कान्होजी आंग्रेंची जयंती साजरी

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड (आरसीएफ), थळ युनिट, अलिबाग येथील आर.सी.एफ. वसाहत, कुरुळ परिसरात मराठा आरमाराचे सरसेनापती सरखेल कान्होजी आंग्रे यांची जयंती अत्यंत श्रद्धापूर्वक आणि उत्साहात साजरी करण्यात आली.



या कार्यक्रमास आर सी एफ थळ युनिटचे कार्यपालक संचालक नितिन हिरडे, प्रकल्प आणि कॉर्पोरेट समन्वय कार्यपालक संचालक ज्योति पाटील , रघुजी आंग्रे यांच्या सह कंपनीचे विविध वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

समारंभाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यानंतर भव्य स्मारकातील सरखेल आंग्रे यांच्या पूर्णकृती पुतळ्यास गगनभरारी व्यासपीठाच्या साह्याने पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राकेश कवळे यांनी केले. आपल्या मनोगतात डॉ. कवळे म्हणाले की, "आजच्या पिढीने सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या जीवनातून प्रेरणा घेणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांच्या धाडसातून आपल्याला राष्ट्रनिष्ठा, त्यांच्या शौर्यातून आत्मविश्वास, त्यांच्या नेतृत्वातून कर्तव्यनिष्ठा, तर त्यांच्या त्यागातून देशसेवेची प्रेरणा मिळते. आज आपण सरखेल कान्होजी आंग्रे यांना अभिवादन करत असताना त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा आदर्श आपल्या आचरणात आणण्याचा संकल्प करूया. आपण ज्या संस्थेत काम करतो, त्या संस्थेच्या प्रगतीसाठी प्रामाणिकपणे, निष्ठेने आणि एकजुटीने योगदान देणे, हीच सरखेल कान्होजी आंग्रे यांना खरी आदरांजली ठरेल."

या प्रसंगी उपस्थितांनी सरखेल कान्होजी आंग्रे यांच्या अद्वितीय शौर्य, कुशल नेतृत्व, अचूक समुद्री युद्धकौशल्य आणि उत्तुंग राष्ट्रभक्तीच्या महान वारशाचे आदराने स्मरण केले.


**३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

सागर सम्राट सहकारी पतपेढी (मर्यादित) पनवेल या संस्थेची ३७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार दिनांक २९ ऑगस्ट, २०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता 'हॉस्पिटल सभागृह ओ.एन जी.सी. कॉलनी. फेज १. ता. पनवेल. जि रायगड या ठिकाणी खालील कामकाजाचा विचार करण्याकरीता आयोजित केलेली आहे. तरी आपण वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

*** सभेपुढील कामकाज ***

१) दिनांक : २७/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) दिनांक ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या कार्याचा प्रशासकांनी तयार केलेला अहवाल तेरीज पत्रक, नफा तोट पत्रक आणि ताळेबंद पत्रकांचे वाचन करुन त्यास मान्यता देणे.
३) सन २०२५-२०२६ च्या लेखा परिक्षण अहवालास मंजूरी देणे.
४) सन २०२६-२०२७ सालच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
५) सन २०२४-२०२५ च्या दोष दुरूस्ती अहवालास मंजूरी देणे.
६) सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता अंतर्गत लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे.
७) सन २०२६-२०२७ या वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नियुक्ती करणे.
८) नफा विभागणीस मान्यता देवून सभासदांना लाभांष/ जाहिर करणे.
९ ) मा. प्रशासकांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

दिनांक: ०७/०८/२०२६

**सही/-**
**श्री. मकरंद लक्ष्मण दरवडे**
**प्रशासक**
**सागर सम्राट सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

विशेष सुचना :- १ सभेला आवश्यक ती गणपूर्ति नसल्यास सभा अर्धा तास तहकूब करून त्याच ठिकाणी त्याच विषयावर अध्यां तासानंतर सभा घेण्यांत येइल अशा सभेला गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही

**कार्यालय : ओ.एन.जी.सी कॉलनी फेज १. शॉप न १०, तालुका पनवेल, जि.रायगड**


## श्रावण मासात केळीच्या पानांचे महत्त्व; पूजा आणि भोजनासाठी मोठी मागणी



**तळा : प्रतिनिधी**

आधुनिक युगात अनेक शोध लागले आहेत आधुनिकतंत्राने कागदाच्या, थर्माकोलच्या पत्रावळ्यांचा व्यवसाय जरी तेजीत चालत असला किंवा हुबेहूब केळीच्या पानांसारख्या हिरव्या पत्रावळ्या आल्या असल्या तरीही श्रावणमासात केळीच्या पानांना अधिक मागणी होत आहे. त्यामुळे या केळीच्या पानांच्या विक्रीतून अनेक आदिवासी बांधवांना एक व्यवसाय मिळत असून उत्पन्नाचे ते एक महिन्यासाठी साधन ठरत आहे.

श्रावण मासात अनेकविविध व्रत, वैकल्ये, आध्यात्मिक कार्यक्रम, ग्रंथवाचन, पूजापाठ आदि आध्यात्मिक कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमासाठी केळीच्या पानांची मागणी ही अधिक प्रमाणात असते.तसेच केळीची पाने दुर्मिळ होत असली तरीही आदिवासी बांधवांना ऑर्डर केली की ते पाने आणून देतात.ही पाने स्वच्छ धूवून भोजन(महाप्रसाद) त्या पानांवर वाढून पारंपारिक पध्दतिने महाप्रसाद ग्रहण केला जातो. तसेच देवासाठी नैवद्यही या पानांवरतीच ठेवत असल्याने सध्या श्रावण मासात या केळीच्या पानांना मागणी वाढत आहे.

ही पाने मिळविण्यासाठी जंगलामध्ये अनेक ठिकाणी रानटी केळीची झाडे जुलै , ऑगस्ट मध्ये उगवलेली असतात. ती केळीची पाने कापून आणून मोठ्या प्रमाणात सोमवार, गुरुवार, शनिवार व मंगळवार या दिवशी बाजारात विक्रीसाठी येतात व थोड्या वेळातच त्या केळीच्या पानांची विक्री होते. आदिवासी समाजाला एक व्यवसाय मिळतो . यापुर्वी ही पाने अधिक प्रमाणात आणली जात होती, मात्र नऊ,दहा वर्षाच्या काळावधीत याचे प्रमाण कमी झाले आहे, तरीही या आधुनिकतेतही धार्मिक सण उत्सव हे पारंपारिक पध्दतिने साजरे होतात. या परंपरेत विज्ञानाची ही जोड असते.त्यापानांमधे औषधी गुणही आहेत. त्यामुळेच या परंपरा आजही टिकून असल्याचे पहावयास मिळत आहे. म्हणूनच केळीच्या पानांना श्रावण मासात महत्व असून केळीच्या पानांची मागणी होते

या केळीच्या पानांवर भोजन घेताना एक वेगळा असा आनंद मिळतो.तसेच विज्ञान व आयुर्वेद याचा ही संबंध यांच्याशी येतो त्यामुळे हे आरोग्यास चांगले असते.तसेच काही भागात हॉटेलमधे ही पाने वापरली जातात.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| **Tend-16/26-27 7000040527 ... 3rd call** | Work of supply & installation of Energy Data acquisition and automatic log sheet generation with real time data monitoring and trending system for all make MFM and ABT meters at various substations under EHV (O&M) Circle, Panvel. **Tender Fee- Rs. 5000/-+ GST** | Rs. 122.44 Lakhs |

EMD minimum Rs. 5000/- or 1% of estimated cost. **Submission of bids from 20.08.2026 to 31.08.2026 at 11:00 hrs, Opening date:- 31.08.2026 @ 11:30 Hrs. for each tender**. For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Admin) Mob. No. 8412050202 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



(जलसंपदा विभाग, शासन निर्णय, क्रमांक, निविदा-०४१७/(प्र.क्र. २४७/१७) मोप्र-१/दिः-१८/१०/२०२३)

**महाराष्ट्र शासन**

**निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, पिन नं-४०२१०७ यांचे कार्यालय

ई मेल पत्ता:- eehmpd@rediffmail.com eehmpd2021@gmail.com, दूरध्वनी-०२१४३-२७८०११

**ई निविदा सूचना क्र. ०५ सन २०२६-२७**

कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील वर्ग ४ अ व पुढील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून (खुला प्रवर्ग) खालील कामांकरीता प्रथम वेळेस ब-१ नमुन्यातील ई-प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाउनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय किंमत | इसारा रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | निविदा संचाची किंमत | कंत्राटदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | हेटवणे वसाहती मधील गोडाऊनचीपरिसंवाद सेमीनार प्रदर्शने इ.साठी दुरुस्ती करणे. | रु. ७५,३९,५०६/- | रु. ७६,०००/- | ०६ महिने (पावसाळ्यासह) | रु. २,०००/- + ३६०/- (१८% GST) एकुण रु. २,३६०/- | सर्वाजनिक बांधकाम विभागाकडील वर्ग ४अ व पुढील नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ( खुला प्रवर्ग) |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | सुरुवात | | समाप्ती | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | वेळ | दिनांक | वेळ |
| १ | निविदा विक्रि आणि डाऊनलोड करण्याचा कालावधी | दि. २५.०८.२०२६ | ११.०० | दि. १.०९.२०२६ | १८.०० |
| २ | बिड सबमिशन करण्याचा कालावधी | दि. २५.०८.२०२६ | ११.०० | दि. १.०९.२०२६ | १८.०० |
| ३ | तांत्रिक लखोटा उघडणेचा दिनांक व स्थान | दि. ०२.०९.२०२६ | १८.०० | कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली ता. पेण जि. रायगड | |

खालील ठिकाणी ई- निविदा बाबत सर्व माहीती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदे सुचने मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)
२) कार्यकारी अभियंता, हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली-पेण कार्यालयातील सूचना फलक.

**जा.क्र.हेमप्रवि/लेशा-१/ई-निविदा सुचना / १८९३/२०२६**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग, कामार्ली, ता. पेण, जि. रायगड,**
**दिनांक :- १९/०८/२०२६**

**विमाका/कोवि/२०२६/२०२७/७७**

**सही/-**
**( दि. का. राजभोज)**
**कार्यकारी अभियंता,**
**हेटवणे मध्यम प्रकल्प विभाग,**
**कामार्ली ता. पेण जि. रायगड**

# ऐरोली-बेलापूरमध्ये ३.८४ लाख मतदार एसआयआर प्रक्रियेबाहेर

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

मतदार याद्या अद्ययावत करण्यासाठी राबविण्यात आलेली विशेष सखोल फेरतपासणी (एसआयआर) प्रक्रिया १७ ऑगस्टला संपली. ऐरोली व बेलापूर या दोन्ही विधानसभा मतदारसंघांतील तीन लाख ८४ हजार ४८३ मतदारांची गणनापत्रांची डिजिटल नोंदणी झालेली नाही. त्यामुळे आता २४ ऑगस्टला प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप मतदार यादीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



या यादीत किती नावे कायम राहतात आणि किती नावे वगळली जातात यावरून एसआयआरच्या प्रक्रियेचे प्रत्यक्ष चित्र स्पष्ट होणार आहे. महापालिकेच्या आकडेवारीनुसार ऐरोली आणि बेलापूर विधानसभा मतदारसंघांतील एकूण नऊ लाख १९ हजार ६९७ मतदारांपैकी पाच लाख ३५ हजार २१४ गणनापत्रांची डिजिटल नोंदणी झाली आहे, मात्र तीन लाख ८४ हजार ४८३ मतदारांची गणनापत्रे या प्रक्रियेत आलेली नाहीत. यामध्ये ऐरोलीतील दोन लाख १९ हजार १५२ (४४.०७ टक्के) आणि बेलापूरमधील एक लाख ६५ हजार ३३१ मतदारांचा (३९.१५ टक्के) समावेश आहे.

म्हणजेच दोन्ही मतदारसंघांतील ४१.८० टक्के मतदारांची गणनापत्रे डिजिटलायझेशनमध्ये आलेली नाहीत. या आकडेवारीत ऐरोली विधानसभा मतदारसंघातील स्थिती अधिक चिंताजनक आहे. बेलापूरच्या तुलनेत ऐरोलीत सुमारे ५४ हजार अधिक गणनापत्रे प्रक्रियेत आलेली नाहीत. त्यामुळे प्रारूप मतदार यादीत होणाऱ्या बदलांचा परिणामही दोन्ही मतदारसंघांत समान राहण्याची शक्यता नाही. विशेषतः ज्या भागांत स्थलांतरित आणि भाडेकरू मतदारांची संख्या मोठी आहे, तेथे गणनापत्र संकलनातील तफावत राजकीयदृष्ट्याही महत्त्वाची ठरणार आहे.

एसआयआरच्या प्रक्रियेदरम्यान घणसोली, कोपरखैरणे, ऐरोली, दिघा आणि तुर्भे परिसरातील काही यादी भागांत गणनापत्र संकलन आणि डिजिटलायझेशन कमी असल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले होते. घणसोली, कोपरखैरणे आणि तुर्भेतील काही भागांत मतदार घरी उपलब्ध नसणे, घरे बंद असणे तसेच गणनापत्र भरून देण्यास विलंब होणे यामुळे काही गणनापत्रे संकलित झाली नसल्याचे प्रशासनाने सांगितले होते. गणनापत्र संकलन वाढवण्यासाठी आयुक्त कैलास शिंदे यांनी राजकीय पक्षांच्या मतदान केंद्रस्तरीय प्रतिनिधींनी (बीएलए) बीएलओंना सहकार्य करण्याचे आवाहनदेखील केले होते.

### २३ सप्टेंबरपर्यंत संधी

महापालिकेने १८ ऑगस्टला प्राप्त झालेल्या गणनापत्रांचे डिजिटायझेशन पूर्ण झाल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आता नव्याने गणनापत्रे स्वीकारण्याऐवजी २४ ऑगस्टला प्रसिद्ध होणाऱ्या प्रारूप यादीतील नोंदी महत्त्वाच्या ठरणार आहेत. मतदार यादीत नाव नसलेल्या पात्र मतदारांना २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या कालावधीत दावे किंवा हरकती दाखल करता येणार आहेत. २२ ऑक्टोबरपर्यंत दावे–हरकतींचा निपटारा करून २७ ऑक्टोबरला अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. एसआयआर अंतर्गत गणनापत्र दाखल न केल्यास प्रारूप मतदार यादीतून नाव वगळले जाऊ शकते.

# नवीन पनवेलमध्ये गांजाविक्रीचा पर्दाफाश

## दोघांना अटक, सहा जण फरार

**नवी मुंबई : बातमीदार**

नवीन पनवेलमधील पंचशीलनगर झोपडपट्टी परिसरात अमली पदार्थविरोधी कक्षाने धडक कारवाई करीत गांजा विक्री करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. १८ ऑगस्ट रोजी रात्री करण्यात आलेल्या या कारवाईत पोलिसांनी दोघांना रंगेहाथ अटक केली असून त्यांच्याकडून सुमारे ५०० ग्रॅम गांजा, मारुती स्विफ्ट कार, आयफोन, सॅमसंग फोल्ड, रियलमी कंपनीचे मोबाइल फोन आणि रोख रक्कम असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील आणखी सहा आरोपी फरार असून त्यांचा शोध सुरू आहे.




अमली पदार्थविरोधी कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने खांदेश्वर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पंचशीलनगर येथील एका दुकानावर छापा टाकला. यावेळी गांजा विक्रीच्या संशयावरून कबीर सलीम शेख (१९, रा. पंचशीलनगर, नवीन पनवेल) आणि विकास उर्फ विकी कलाप्पा गायकवाड (२२, मूळ रा. सोलापूर, सध्या रा. पनवेल) यांना ताब्यात घेण्यात आले.

पोलिसांनी केलेल्या झडतीत हिरवट रंगाचा सुमारे ५०० ग्रॅम गांजा आढळून आला. त्याचबरोबर गांजा विक्रीसाठी वापरली जाणारी कार तसेच महागडे मोबाइल फोन आणि रोख रक्कम जप्त करण्यात आली. आरोपी इतर साथीदारांकडून गांजा आणून आर्थिक फायद्यासाठी संगनमताने त्याची विक्री करीत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. या प्रकरणात नवाज शेख, अरुण लाला सय्यद, रईस लाला सय्यद, शकिल शेख, राजू बगाडे (सर्व रा. ओल्ड पनवेल) आणि सलमान (रा. गोवंडी) हे सहा आरोपी फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

खांदेश्वर पोलीस ठाण्यात एनडीपीएस कायदा, भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. वपोनि. संदीप निगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# नगरविकासकडून परवडणाऱ्या घरांना प्रोत्साहन : प्रधानमंत्री आवास योजनेसाठी एफएसआयमध्ये वाढ

**नवी मुंबई : बातमीदार**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी महानगरांमध्ये घरकुल उभारणीला चालना देण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र सरकारने बांधकाम नियमांत मोठ्या सवलती प्रस्तावित केल्या आहेत. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत लाभार्थी–आधारित बांधकामाला विकास शुल्कातून सूट देण्याबरोबरच काही प्रकल्पांना २.५ पर्यंत मूलभूत एफएसआय आणि १२ मीटर किंवा त्याहून अधिक रुंदीच्या रस्त्याला लागून असलेल्या निवासी भूखंडावर कमाल ३ एफएसआय देण्याचा प्रस्ताव आहे.



७ ऑगस्ट रोजी एकत्रित विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीत बदलाची सूचना प्रसिद्ध केली असून त्यावर सूचना व हरकती मागविल्याचे नवी मुंबईतील विकासकाने सांगितले. प्रधानमंत्री आवास योजनेतील प्रकल्पांसाठी २.५ एफएसआयपर्यंतचा भाग मूलभूत एफएसआय म्हणून ग्राह्य धरला जाईल. बांधकाम क्षमता २.५ पेक्षा अधिक असल्यास अतिरिक्त क्षमता प्रीमियम एफएसआय, टीडीआर वापरता येणार आहे. प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थी–आधारित बांधकाम प्रकल्पांसाठी विकास शुल्क आकारले जाणार नाही.

प्रस्तावित तरतुदीनुसार अशा प्रकल्पांना प्रीमियम शुल्कातूनही सूट देण्यात येणार आहे. प्रस्तावित फेरबदलाला अंतिम मान्यता मिळेपर्यंत त्यातील तरतुदी तत्काळ लागू राहतील, असे शासनाने स्पष्ट केले आहे. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) २.० अंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी परवडणारी आणि भाडेतत्त्वावरील घरे निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे.

महाराष्ट्रात योजनेच्या अंमलबजावणीसाठी गृहनिर्माण विभागाने १५ ऑक्टोबर २०२४ रोजी शासन निर्णय काढला होता. त्यानंतर आता बांधकाम नियमांत योजनेला पूरक बदल प्रस्तावित केले आहेत.

# महापेतील ऐतिहासिक बुरुजाला अभय

## तोडक परवानगी नाही

**नवी मुंबई : बातमीदार**

महापे एमआयडीसी परिसरातील ऐतिहासिक बुरुजाच्या संरक्षणासाठी सुरू असलेल्या आंदोलनाला अखेर यश मिळाले आहे. एमआयडीसीने संबंधित वास्तू पाडण्यासाठी कोणतीही तोडक परवानगी देणार नसल्याचे आश्वासन दिल्याने आंदोलनकर्त्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या ऐतिहासिक वास्तूचे जतन करण्यासाठी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आंदोलनाला पाठिंबा दिला आहे. महापे एमआयडीसी परिसरात असलेली ही ऐतिहासिक संरचना नवी मुंबईच्या जुन्या इतिहासाची साक्ष देणारी असल्याचा दावा आंदोलनकर्त्यांकडून करण्यात येत आहे. औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत शहराचा विस्तार होत असताना ऐतिहासिक वास्तू आणि संरचनांचे अस्तित्व धोक्यात येऊ नये यासाठी त्यांचे संरक्षण करणे आवश्यक असल्याची भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

या पार्श्वभूमीवर ऐतिहासिक बुरुजाच्या संरक्षणासाठी आंदोलन सुरू करण्यात आले. नवी मुंबईतील नागरिक, लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय पक्षांचे पदाधिकारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी आंदोलनस्थळी भेट देत आपला पाठिंबा दिला. हा प्रश्न केवळ एका वास्तूच्या संरक्षणापुरता मर्यादित नसून नवी मुंबईच्या ऐतिहासिक वारशाच्या जतनाचा असल्याचे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले. एमआयडीसीचे आरओ खांडेकर यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधला. संबंधित ऐतिहासिक संरचना तोडण्यासाठी भूखंडधारकाला कोणत्याही प्रकारची तोडक परवानगी देण्यात येणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# आमदार मंदा म्हात्रे यांच्याकडून विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

धाराशिव तुळजापुरातील खडकी गावासोबत शिवाजीनगर तांडासह मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना दरवर्षीप्रमाणेच यंदाही आमदार मंदा म्हात्रे यांच्यातर्फे सामाजिक कार्यकर्ते सुनील नागणे यांच्या माध्यमातून शालेय साहित्य वाटप करण्यात आले. यावेळी गावातील नागरिकदेखील उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जन्मदिनामित्त हा उपक्रम राबविण्यात आला.

आमदार मंदा म्हात्रे या खडकी गावास दरवर्षी मदत देत असतात. मागील वर्षी पाऊस भरपूर झाल्याने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. त्यादरम्यानदेखील आमदार मंदा म्हात्रे यांनी दिवाळी किट देऊन ग्रामस्थांची दिवाळी गोड केली होती. यंदाही ६०० ते ७०० विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आले.

शरफोद्दीन मुजावर, परमेश्वर शिंदे, शिवाजी जाधव, लालसिंग चव्हाण, पंडित गायकवाड, शांताबाई कोरे, मथुराबाई नागणे, बलभीम जाधव, भागवत साळुंखे, संतोष शिंदे, मल्लिनाथ गायकवाड, दादाराव खोडके, तात्याराव शिंदे, गौसपाक सय्यद, विजय साळुंखे उपस्थित होते.

# मयत परिवहन कर्मचाऱ्याच्या कुटुंबाला सभापतींकडून मदत



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई पालिकेच्या परिवहन सेवेत असलेले अमित जोशी यांचे घणसोली डेपोमध्ये हृदयविकाराच्या झटक्याने ऑन ड्युटी निधन झाले होते. या घटनेमुळे दिघा येथे राहणाऱ्या जोशी कुटुंबीयांवर संकट कोसळले आहे, मात्र त्या कुटुंबीयांसाठी परिवहन सभापती विकास झंजाड धावून आले आहेत. झंजाड यांनी आपल्या सभापती काळातील पाच महिन्यांचे मानधन या कुटुंबाला देऊन एक आदर्श निर्माण केला आहे.

अमित जोशी हे विष्णूनगर, दिघा येथे राहत होते. ३१ जुलै रोजी घणसोली डेपोमध्ये त्यांना हृदयविकाराचा झटका आला. यात त्यांची प्राणज्योत मालवली. या धक्क्याने जोशी कुटुंबीयांवर आभाळ कोसळले. जोशी कुटुंबीयांसमोर आता उदरनिर्वाहाचा प्रश्न उभा ठाकला आहे. नियमानुसार जोशी कुटुंबीयांना परिवहन सेवेतून मदत मिळेल, मात्र या मदतीची वाट न पाहता परिवहन सभापती विकास झंजाड यांनी पुढे येत आपल्या पाच महिन्यांच्या काळातील मानधन जोशी कुटुंबीयांना दिले. यावेळी त्यांनी जोशी कुटुंबीयांची भेट घेत त्यांना पुढील मदतीचेदेखील आश्वासन दिले. या कृतीतून झंजाड यांनी आदर्श लोकप्रतिनिधीचे उदाहरण घालून दिले आहे.

# श्री द्वारकाधीश मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी सोहळा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आपटा फाटा, कर्नाळा येथील साईहरि क्षेत्रातील श्री द्वारकाधीश मंदिरात श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ ते रात्री ८.३० वाजेपर्यंत प्राची पुरंदरे यांची संगीतसेवा होणार आहे. त्यानंतर रात्री ९.३० ते ११.३० वाजेपर्यंत सुप्रसिद्ध नृत्यांगना अपेक्षा निरंजन यांचा ‘कृष्ण यामिनी’ हा भरतनाट्यम नृत्याविष्कार सादर करण्यात येणार आहे. ५ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत हभप वैभवबुवा ओक यांचे कालाकीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्यानंतर सकाळी ११.३० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत दहीहंडी व गोपाळकाला कार्यक्रम होईल.

शनिवारच्या रात्री ११.३० ते ११.५५ या वेळेत श्रीकृष्ण पूजन, नामस्मरण व गजर करण्यात येणार असून मध्यरात्री १२ वाजता श्रीकृष्ण जन्मोत्सव आणि पाळणा होणार आहे.

# धर्मवीर संभाजीराजे चॅरिटेबल ट्रस्टकडून मोफत वह्यावाटप



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लागावा, त्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे आणि त्यांच्या पुढील वाटचालीला प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शिवसेना शिंदे गटाच्या अश्विनी दत्ता घंगाळे यांच्या पुढाकारातून खासदार नरेश म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी करावे सीवूड्स येथील श्रेया गहिनीनाथ तांडेल हिने पायलटचे शिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून पायलट होण्याचा बहुमान मिळवल्याबद्दल तिचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाला शिवसेना जिल्हाप्रमुख किशोर पाटकर, महिला आघाडी जिल्हा संघटक सरोज पाटील, शिवसेना आगरी विभाग महाराष्ट्र राज्य समन्वयक नामदेव भगत, शहरप्रमुख विजय माने, नगरसेवक अमित पाटील, मा. नगरसेवक दिलीप घोडेकर, रतन मांडवे, कामगार नेते रवींद्र सावंत, प्रहार सामाजिक संघटनेचे प्रवीण खेडकर, करावे गावचे समाजसेवक बी. आर. तांडेल, जयवंत पाटील, निशिकांत पाटील, ॲड. संदीप साळुंखे, देवकी शिंदे, स्वप्नील यादव, आशिष गव्हाणे, पंकज पाचपुते आणि युवा सेनेचे साईनाथ वाघमारे, चेतन पाटील यांच्यासह शिवसैनिक, कार्यकर्ते, विद्यार्थी, पालक आणि विभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# करंजा बंदरात जाळी दुरुस्तीला वेग

**उरण : प्रतिनिधी**

मासेमारी बंदीच्या कालावधीत मच्छीमार ४०० ते ५०० फुटांच्या महाकाय जाळीच्या दुरुस्तीचे (शिवण्याचे) काम करतात. या कामात आंध्र प्रदेशातील कारागीर अधिक प्रवीण मानले जात असल्याने मच्छीमार त्यांना बोलावतात. दरवर्षी ४००पेक्षा अधिक कारागीर उरणमध्ये येत असल्याची माहिती स्थानिकांनी दिली.



खोल समुद्रात मासेमारी करणाऱ्या बोटींवर २०० फुटांपेक्षा लांब व ५० ते ६० फूट रुंद अशी जाळी वापरली जाते. मासळी पकडताना ही जाळी अनेकदा फाटते. त्याला ठिगळ बसवावे लागते. मासेमारी बंदीच्या काळात ही जाळी दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात येते. महाकाय अशा या जाळीची दुरुस्ती करणे हे जिकिरीचे काम आहे. मशीनच्या साहाय्याने तयार करण्यात आलेली ही जाळी शिवण्याचे कौशल्य आंध्र प्रदेशातील कारागिरांना आहे.

त्यामुळे गेल्या अनेक वर्षांपासून हे काम त्यांच्याकडून केले जात आहे. हे कारागीर मे महिन्यापासूनच करंजा बंदरात दाखल होतात. ते गणेशोत्सवापर्यंत काम पूर्ण करून आपल्या राज्यात परततात, अशी माहिती करंजा येथील मच्छीमार नेते निशिकांत नाखवा यांनी दिली. करंजा बंदर परिसरात जाळी विणण्यासाठी येणारे कारागीर तासाला ११० रुपये घेतात. या काळात ३०० बोटींवरील जाळी शिवली जाते.


एका बोटीमागे सहा लाख रुपये खर्च येतो. त्यामुळे या बंदरात तब्बल १८ कोटींची आर्थिक उलाढाल होते, अशी माहिती करंजा बंदर मच्छीमार संस्थेचे माजी उपाध्यक्ष रमेश नाखवा यांनी दिली. आंध्र प्रदेशमधील तिरकापूरम या किनारपट्टी भागातून दरवर्षी करंजा बंदरात मासेमारी जाळी विणण्याचे काम करण्यासाठी कारागीर येतात. त्यांची राहण्याची व्यवस्था बोट मालक करतात. या काळात त्यांना चांगली मजुरी मिळते.

राम प्रहर

श्रावणधारा

## लाडका श्रावण

श्रावणा संगी अवतरती
नवे मेघ, नवे रंग, नवे उमंग।
अवघी जीवसृष्टी बहरली,
मनी हर्ष, रंगात रंगे श्रीरंग॥
श्रावणात उगीच भरी हुंकार,
बालपणीचे मन अवखळ।
क्षणात विस्मरे, तंग आयुष्याची
मृगजळी धावपळ॥
चहू भूमी सह सागर–सरीता,
कड्यापठार डोंगर दरी।
उधळत्या खट्याल वारूपरी
बरसती श्रावणी धुंद सरी॥
बहकणाऱ्या मनाला,
सुचती नित्य गीत नवे।
जणू दुष्काळी नयनात,
हिरवे स्वप्न अवतरावे॥
श्रावणाची गोडी भारी,
नूतन उभारी या संसारी।
सर्व ऋतूचा महाराजा,
बहरलेली सृष्टी सारी॥
श्रावणी मेघ दाटले घनघोर,
नाचे आनंदाचा मनी मोर।
बहु रंगाची उधळण,
घनश्याम कृपेच्या सरीवर सर॥
बेभान मन धुंद, खुलूनी प्रमोद,
श्रावणी स्फुरे कवन।
वर्षातून येई हर्ष द्याया,
आला आला लाडका श्रावण॥



–ॲड. प्रमोद म्हात्रे,
पनवेल

# ‘उद्योगांना दिलेल्या पडीक जमिनी परत घेऊन अन्य उद्योजकांना देणार’

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात उद्योगांसाठी यापूर्वी देण्यात आलेल्या मात्र अद्याप वापरात नसलेल्या पडीक जमिनींची माहिती प्रशासनाकडून घेतली जाणार असून, या जमिनी उद्योग विभागाच्या ताब्यात घेऊन त्या अन्य उद्योजकांना देण्यात येतील, अशी स्पष्ट भूमिका पालकमंत्री भरत गोगावले यांनी मांडली. उद्योगांना जमीन देऊनही प्रकल्प उभारले जात नसतील, तर अशा जमिनींचा पुनर्वापर करण्याबाबत शासन गांभीर्याने विचार करणार असल्याचे त्यांनी सांगितले.अलिबाग इथं जिल्हास्तरीय गुंतवणूक परिषदेच्या उद्घाटनानंतर ते



पत्रकारांशी बोलत होते.

रायगडमध्ये औद्योगिक गुंतवणुकीला मोठा वाव असताना अनेक उद्योगांना यापूर्वी जमिनी देण्यात आल्या होत्या. मात्र, काही जमिनींचा अद्याप अपेक्षित वापर झालेला नसल्याचे गोगावले यांनी नमूद केले. त्यामुळे अशा पडीक जमिनींची सद्यस्थिती प्रशासनाकडून तपासली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

रायगडमध्ये नव्या उद्योगांच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगार उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले. रोजगारासाठी मुंबई, पुणे आणि गुजरातकडे जाणाऱ्या तरुणांना जिल्ह्यातच रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास त्यांचे स्थलांतर रोखता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

दिघी पोर्टच्या विस्ताराला मच्छीमारांकडून होत असलेल्या विरोधाबाबतही गोगावले यांनी संवादाची भूमिका घेतली. नव्या प्रकल्पांना सुरुवातीला विरोध होत असतो; मात्र, दिघी पोर्टच्या विस्तारामुळे रायगड आणि स्थानिकांना होणारे फायदे मच्छीमारांना समजावून सांगून त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी सांगितले.

## माणगाव एसटी बसस्थानकात हिरकणी कक्षाचे उद्घाटन

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्य परिवहन महामंडळाच्या माणगाव बस स्थानक येथे महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या विशेष सहकार्यातून महिलांसाठी उपलब्ध करून देण्यात आलेल्या हिरकणी कक्षाचे उद्घाटन मंगळवार दि. १८ ऑगस्ट रोजी माणगाव पंचायत समितीच्या माजी सभापती तथा विद्यमान पंचायत समिती सदस्या संगीता बक्कम व राष्ट्रवादी काँग्रेस सोशल मीडिया प्रमुख किशोरी हिरवे यांच्याहस्ते फित कापून उत्साहात करण्यात आले.



या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते चेतन गवाणकर,माणगाव आगाराचे सहायक वाहतूक निरीक्षक तुषार हाटे,वाहतूक नियंत्रक रविंद्र वाढवळ,दीपक गोरेगावकर,लक्ष्मण पांचाळ,प्रवीण मोरे,रोशनी तेलंगे, संगीता सूर्यवंशी, गीता डोंगरकर,सायली जाधव, योगेश टेकाळे, युवराज गालींदे,सागर कोळवणकर,चंद्रकांत मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

# राज्यस्तरीय विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेत रायगडातील विद्यार्थ्यांचे यश

**पाली : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या परिवहन विभाग, राज्य मराठी विकास संस्था, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘अभिजात मराठी, अभिमान मराठीचा’ या उपक्रमांतर्गत झालेल्या विश्वकोश ज्ञानवर्धन स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील पाली येथील जी. बी. वडेर हायस्कूल व व. ग. ओसवाल कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर यश संपादन केले आहे.

सारंग बल्लाळ ठाकूर याने राज्यात चौथा तर वैष्णव सुशील थळे याने पाचवा क्रमांक पटकावत रायगडच्या शैक्षणिक क्षेत्राची राज्यस्तरावर दखल मिळवून दिली.

राज्यस्तरीय स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा कौतुक व पुरस्कार सोहळा ठाणे येथील राम गणेश गडकरी रंगायतन येथे पार पडला. या सोहळ्यात राज्यभरातून विविध स्तरांवर यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला.

सारंग ठाकूर आणि वैष्णव थळे यांच्या उल्लेखनीय यशाबद्दल परिवहनमंत्री प्रताप सरनाईक आणि उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते त्यांना ट्रॉफी, प्रमाणपत्र तसेच रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर मिळविलेल्या या यशामुळे पालीसह संपूर्ण सुधागड तालुका आणि रायगड जिल्ह्यात कौतुकाचा सूर उमटत आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे प्रोत्साहन यांचा मोठा वाटा आहे. शाळेचे प्राचार्य भाऊसाहेब घोडके, उपप्राचार्य आदिनाथ पोटे, मार्गदर्शक शिक्षक विक्रम काटकर व सुधीर शिंदे तसेच विद्यार्थ्यांचे पालक या सोहळ्यास उपस्थित होते. या यशामुळे रायगड जिल्ह्याचे नाव महाराष्ट्राच्या शैक्षणिक नकाशावर अभिमानाने कोरले गेले आहे, असे प्राचार्य भाऊसाहेब घोडके यांनी सांगितले.




# रोह्यात १०५ वर्षांची परंपरा असलेल्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे कार्यक्रम जाहीर

**रोहा : प्रतिनिधी**

एक गाव एक गणेश उत्सव या अभिनव संकल्पनेची जोड देऊन रोह्याच्या सार्वजनिक गणेशोत्सव १०५ व्या वर्षात पदार्पण करीत आहे. गेली १०४ वर्ष गणेशोत्सव निमित्ताने विविध कार्यक्रम घेण्यात येत असतात.

या १०५व्या वर्षी गणेश उत्सव समितीच्या वतीने मनोरंजना बरोबरच लोकप्रबोधन व स्थानिक कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्याचा या वर्षी त्यांनी प्रयत्न केला आहे. याचबरोबर कार्यक्रमांमध्ये नावीन्य आणण्याचाही त्यांनी प्रयत्न केले आहे.

जुन्या परंपरा व नव्या सुधारणा यांचा सुयोग्य संगम साधून यावर्षी गणेश उत्सव १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर दरम्यान भाटे सार्वजनिक वाचनालयाच्या सभागृहात साजरा करण्यात येणार असून या निमित्ताने विविध



कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती उत्सव समिती अध्यक्ष अमेय जोशी यांनी दिली आहे.

गणेशोत्सवाच्या निमित्ताने आयोजित विविध कार्यक्रमांमध्ये १४ सप्टें. स.१० वा. श्रींचे आगमन, १५ सप्टें सायं.५ वा. भजन, १६ सप्टें स.१० वा. श्लोक पाठांतर व चित्रकला स्पर्धा, रात्रौ ९.३० वा. स्थानिक कलावंतांचे विविध कलागुण दर्शन, १७ सप्टें.सायं ५ वा. सखी भजनी मंडळ रोहाचे भजन, १८ सप्टें.सायं.५ वा. राधेश्याम भजनी मंडळ रोहा (भावसार) यांचे भजन, १९ सप्टें.रात्रौ ९.३० वा. भजन, २० सप्टें. स.८ वाजता सहस्त्रावर्तन, स.१० वा. श्री सत्यनारायण महापूजा, स.१०.३० वा. द.ग.तटकरे रक्तपेढी रोहा, सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्ट व स्फुर्ती प्रतिष्ठान रोहा यांच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर, सायं.५ वा. नवनूतन भजन मंडळ रोहा यांचे हळदी कुंकू व भजन, रात्रौ ९.३० वाजता जादूगार योगेश सोनवणे (नवी मुंबई ) यांचे जादूचे प्रयोग, २१ सप्टें.सायं.४ वा. अभंग सेवा मंडळ रोहा (हेमंत ओक व सहकारी) यांचे भजन, सायं.६ वा. ह.भ.प. श्री संदीप बुवा मांडके पुणे यांचे सुश्राव्य कीर्तन, रात्रौ ९.३० वा. श्री प्रसन्न बाम सौ स्नेहल दामले व सहकारी पुणे यांचे गीतरामायणच्या माध्यमातून रामतत्वाची काल सुसंगत मांडणी असलेले गीत रामायण अवघ्या आशा श्री रामार्पण,२२ सप्टें.सायं.६ वा. डोंबिवली येथील ओमकार दाभाडकर यांचे अश्लील वातावरणात मुलांना घडवावा कसं यावर व्याख्यान,

रात्रौ ८ वा. सौ स्नेहा आंब्रे यांनी सादर केलेले स्पंदन निर्मित बालनाट्य, रात्रौ.९.३० वा. श्रेया सचिन आठवले व सहकारी दादर यांचे संगीत ( एक्सप्रेस ऑर्केस्ट्रा) फुलले रे क्षण, २३ सप्टें.स.१० वा. कॅरम व बुद्धिबळ स्पर्धा, सायं. ४ वा. रोहा श्री शरीर सौष्ठव स्पर्धा, २४ सप्टें.सायं.५ वा. पाककला स्पर्धा, रात्रौ ९.३० वाजता दुर्गेश काळे व सहकारी पुणे यांचे चांगभलं द व्हॉइस ऑफ दख्खन, २५ सप्टें.सायं.४ वा. अहवाल वाचन, सायं.५ वा. श्री ची भव्य मिरवणूक व विसर्जन आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

# रायगड पोलिसांतर्फे विशेष ‘प्रेरणा’ कार्यक्रम; गुणीजनांचा सत्कार

**माणगाव : बातमीदार**

वनवासी कल्याण आश्रम शाळा, उतेखोल येथे १८ ऑगस्ट रोजी रायगड जिल्हा पोलीस प्रशासनाच्या वतीने ‘प्रेरणा’ या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार, बालहक्क आणि स्वसंरक्षण याबाबत प्रभावी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळे दरम्यान सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. आदिवासी समाजातील प्रथम एलएल.बी. शिक्षण घेतलेल्या कन्या सपना वाघमारे तसेच आदिवासी समाजातील प्रथम पत्रकार भिवा पवार यांचाही यावेळी गौरव करण्यात आला. दोघेही गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी समाजाला मुख्य



प्रवाहात आणण्यासाठी कार्यरत आहेत.

यावेळी सर्व विकास दीप संस्थेचे कार्यकर्ते डॉ. महेश मोरे यांचाही विशेष सन्मान करण्यात आला. डॉ. मोरे हे गेल्या अनेक वर्षांपासून आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. ग्रामपंचायत स्तरावरील गाव बाल संरक्षण समित्यांच्या बळकटीकरणात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. बालकांच्या समस्या व अडचणी ग्रामपंचायत स्तरावर प्रभावीपणे मांडून त्या सोडविण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत.

शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी स्वसंरक्षण आणि बालविकास विषयावर विविध प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यातही डॉ. मोरे यांचा सक्रिय सहभाग राहिला आहे. माणगाव तालुक्यात बालसभा, बालपंचायत आणि तालुका बालपंचायत यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध यंत्रणांशी जोडण्याचे काम त्यांनी केले आहे. तसेच पोलीस प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व्हावा, नागरिकांनी आपल्या समस्या पोलिसांपर्यंत योग्य पद्धतीने मांडाव्यात आणि पोलीस हे विद्यार्थ्यांचे मित्र आहेत, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक अंचल दलाल यांच्या वतीने डॉ. मोरे यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी शशिकांत पवार यांच्या हस्ते रोप देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | नावडे ११६ | ८५/३७ | २६/२ | ०-४६-८ | ४०० चौ.मी. | नोड-खारघर, भूखंड क्र. १०, सेक्टर-४३, क्षेत्र-४०० चौ.मी. | **कै. जगन्नाथ हरिभाऊ पाटील व सिताबाई जगन्नाथ पाटील (मयत) यांचे वारस**<br>१) संजय जगन्नाथ पाटील<br>२) राजेश जगन्नाथ पाटील<br>३) किशोर जगन्नाथ पाटील<br>४) वनिता जगन्नाथ पाटील उर्फ वनिता ज्ञानेश्वर पाटील | - |
| | | | **एकूण क्षेत्र** | **०-४६-८** | | | | |
| २ | द्रोणागिरी १३२ | नवघर ४१५ | ३८२/१अ<br>३७२/७ब<br>३८६/७क<br>३५६/९<br>३५८/४<br>३६२/१अ<br>३६७/६अ<br>३५९/५ब<br>३७१/२<br>३७३/३ब<br>३७४/५ब<br>३८४/२<br>३७६/४<br>३७९/१०ब | ०-१२-०<br>०-०५-०<br>०-१५-०<br>०-०२-८<br>०-०८-६<br>०-२५-४<br>०-१६-२<br>०-१९-८<br>०-१२-६<br>०-०५-०<br>०-०९-६<br>०-१२-९<br>०-११-९<br>०-०२-५ | २४०० चौ.मी. | भूखंड क्र.०५, सेक्टर-५८, क्षेत्र-२४०० चौ.मी. | १. श्री. हरिश्चंद्र विठ्ठल पाटील<br>२. सौ. यमुना अमृत पालकर<br>३. सौ. चांगुना सुरेश ठाकूर<br>४. सौ. रंजना शरद म्हात्रे<br>५. श्रीमती वनिता शिवदास पाटील<br>६. श्रीमती पुजा शिवदास पाटील<br>७. श्रीमती भारती दशरथ पाटील<br>८. श्री. निखिल दशरथ पाटील<br>९. श्री. अक्षय दशरथ पाटील<br>१०. श्रीमती प्रियंका दशरथ पाटील उर्फ प्रियंका आशिष भगत<br>११. श्रीमती सुवर्णा चंद्रकांत पाटील<br>१२. श्रीमती स्मिता नितिन ठाकूर<br>१३. श्री. निशांत चंद्रकांत पाटील<br>१४. श्री. कुणाल चंद्रकांत पाटील<br>१५. श्रीमती सावित्री रामनाथ पाटील<br>१६. श्री. रुपेश रामनाथ पाटील<br>१७. सौ. अर्चना ललित पाटील उर्फ अर्चना रामनाथ पाटील<br>१८. श्री. विनायक रामनाथ पाटील | निरंक |
| | | मुठेखार २०/८५ | ७/३-क-२ | ०-८४-५ | | | | |
| | | शेमटीखार १०/११-१२ | ७/६<br>१/१<br>३/१अ | ०-०८-१<br>०-०७-६<br>०-१६-७ | | | | |
| | | **एकूण संपादित क्षेत्र** | | २-७६-३ | | | | |
| ३ | रोडपाली | ५० | ५१/२ | ०-०२-३ | प्रत्येकी ४० चौ.मी. | भूखंड क्र. ७२/१, सेक्टर-१६ई, क्षेत्र-४० चौ.मी. कळंबोली नोड | कै. सखुबाई चिंध्या घरत (मयत) यांचे वारस - श्रीमती. सिध्दी संदीप तांडेल | निरंक |
| ४ | कामोठे ६५९ | ३८६D पनवेल | ७०६/पै<br>७०८/२अ<br>६९८/७पै<br>६९८/३<br>१२४/२ | ०-६२-७<br>०-२९-६<br>०-२७-६<br>०-०८-३<br>०-७५-१ | १०५० चौ.मी. | भूखंड क्र. ९७+९८+९९, सेक्टर-१७, क्षेत्र-१०५० चौ.मी. पनवेल नोड | कै. रमाबाई आत्माराम आटवणे (मयत) यांचे वारस :<br>१) कै. पुरुषोत्तम आत्माराम आटवणे (मयत) व कै. उषा पुरुषोत्तम आटवणे (मयत) यांचे वारस<br>१.१) श्री. सागर पुरुषोत्तम आटवणे,<br>१.२) श्रीमती. नंदिनी सचिन शेंडे, १.३) श्रीमती. स्वाती श्रीकांत तिपरादी,<br>२) कै. मनोहर आत्माराम आटवणे (मयत) व कै. मनिषा मनोहर आटवणे (मयत) यांचे वारस<br>२.१) श्री. विशाल मनोहर आटवणे,<br>२.२) श्री. संजिव मनोहर आटवणे, २.३) श्रीमती. सविता किशोर हल्याळ,<br>३) कै. मधुकर आत्माराम आटवणे (मयत) यांचे वारस<br>३.१) श्रीमती. सरिता आत्माराम आटवणे,<br>३.२) श्री. चैतन्य आत्माराम आटवणे,<br>३.३) श्री. विवेक आत्माराम आटवणे,<br>४) कै. सुमन दयानंद वेळमल्ली (मयत) यांचे वारस<br>४.१) श्रीमती. विद्या किशोर ठोकडे<br>५) श्री. शरद आत्माराम आटवणे | निरंक |
| | | २१६ पनवेल | ३३४ | ०-११-० | | | | |
| | | ३८६ पनवेल | ६१० | ०-२२-३ | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
१२.५ टक्के भूमी विभाग, सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/१९६/२०२६-२७

# कोलंबो कसोटीआधी श्रीलंका बॅकफूटवर

## मेंडिस, निसंकासह चंडीमलही दुखापतीमुळे संघाबाहेर

**कोलंबो : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने गॉल कसोटीत धमाकेदार विजय मिळवत श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत १-० अशी आघाडी घेतली. या पराभवातून सावरून मालिकेत पुनरागमन करण्याचे मोठे आव्हान श्रीलंकेसमोर असतानाच कोलंबो कसोटीआधी यजमानांना धक्क्यावर धक्के बसले आहेत.

श्रीलंकेचे मुख्य प्रशिक्षक गॅरी कर्स्टन यांनी संघातील खेळाडूंच्या दुखापतीबाबत मोठी अपडेट दिली आहे. गॉल कसोटीनंतर बोलताना कर्स्टन म्हणाले, कुसल मेंडिसला हॅमस्ट्रिंगची गंभीर दुखापत झाली आहे. त्यामुळे तो काही काळ उपलब्ध नसणार आहे.



त्याचप्रमाणे पथुम निसंका आणि दिनेश चंडीमलही पुढील कसोटीसाठी उपलब्ध नसतील. त्यामुळे कोलंबो कसोटीत टीम इंडियाचे पारडे आणखी जड झाल्याचे चित्र आहे.

कुसल मेंडिसच्या जागी पहिल्या कसोटी सामन्यात निरोशन डिकवेलाला संधी देण्यात आली होती. जवळपास तीन वर्षांनंतर दमदार पुनरागमन करताना डिकवेलाने पहिल्या डावात ८० धावांची शानदार खेळी केली.

पथुम निसंका मनगटाच्या शस्त्रक्रियेतून सावरत आहे, तर पहिल्या कसोटी सामन्यात दिनेश चंडीमलला दुखापत झाली आणि त्याला मैदान सोडावे लागले. त्यानंतर 'कनकशन सब्स्टिट्यूट' म्हणून त्याच्या जागी पसिंदू सूरियाबंदराला कसोटी पदार्पणाची संधी मिळाली, मात्र पदार्पणाच्या दुसऱ्या डावात तो खातेही न उघडता माघारी परतला.

### टीम इंडिया फॉर्ममध्ये

गॉल कसोटीत देवदत्त पडिक्कलची फलंदाजी आणि मानव सुथारची गोलंदाजी या जोरावर भारतीय संघाने १६५ धावांनी मोठा विजय साकारला. पडिक्कलने पहिल्या डावात १६७ धावा आणि दुसऱ्या डावात ४४ धावा केल्या; तर सुथारने पहिल्या डावात चार आणि दुसऱ्या डावात सहा विकेट्स घेतल्या. इतर खेळाडूंनी या दोघांना साथ दिली. श्रीलंकेच्या भूमीवर दणदणीत विजयाने भारतीय संघाचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यामुळे दुसरी कसोटी जिंकून मालिका विजयासाठी टीम इंडिया मैदानात उतरले. दुसरीकडे श्रीलंकेला आता विजय अनिवार्य आहे, कारण सामना ड्रॉ झाला तरी भारत मालिकेत विजेता ठरेल.

# वेस्ट इंडिज मालिकेपूर्वी रोहित शर्माचा जोरदार सराव

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा काही काळाच्या विश्रांतीनंतर मुंबईत परतला असून आगामी एकदिवसीय मालिकेसाठी जोरदार तयारीला लागला आहे. ३९ वर्षीय रोहितने मुंबईतील एमसीएच्या वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स (बीकेसी) मैदानावर धावण्याचा सराव सुरू केला आहे. त्याच्या या सराव सत्राचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे, ज्यामध्ये तो काही प्रशिक्षकांसोबत कसून मेहनत घेताना दिसत आहे.

रोहित शर्मा शेवटचा जुलै महिन्यात इंग्लंडविरुद्ध झालेल्या मालिकेत खेळला होता, जिथे भारताला २-१ने पराभव पत्करावा लागला होता. या मालिकेनंतर मिळालेल्या महिनाभराच्या विश्रांतीनंतर आता तो वेस्ट इंडिजविरुद्धच्या आगामी एकदिवसीय मालिकेवर लक्ष केंद्रित करून मैदानात उतरला आहे.

दरम्यान, २७ सप्टेंबरपासून भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यात तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका सुरू होत आहे. बीसीसीआयने अद्याप या मालिकेसाठी अधिकृत भारतीय संघाची घोषणा केलेली नाही, परंतु तज्ज्ञांच्या मते तंदुरूस्त आणि उत्कृष्ट फॉर्ममध्ये असलेला रोहित शर्माचे संघामधील स्थान जवळपास



निश्चित मानले जात आहे. स्वतःला पूर्णपणे तंदुरूस्त ठेवण्यासाठी मुंबईच्या मैदानांवर नेहमीच कसून मेहनत घेणाऱ्या रोहितच्या या पुनरागमनामुळे चाहत्यांमध्ये कमालीचा उत्साह पाहायला मिळत आहे.

इंग्लंडविरुद्धच्या मालिकेदरम्यान रोहितचे आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील भवितव्य आणि त्याचे वय यावरून जोरदार चर्चा रंगली होती. निवड समिती तरुण खेळाडूंना संधी देण्याच्या विचारात असल्याचे वृत्त होते, तर काही जणांच्या मते ती त्याची अखेरची मालिका ठरू शकते, मात्र लॉर्ड्सवर शानदार शतक झळकावून रोहितने आपल्यावरील सर्व शंकांना आणि टीकाकारांच्या तोंडाला सडेतोड उत्तर दिले. या खेळीमुळे त्याच्या कारकिर्दीला आणखी नवी दिशा मिळण्याची शक्यता आहे.

# हॅरी ब्रूक कसोटी क्रमवारीत अव्वल



**दुबई : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) नुकतीच ताजी कसोटी क्रमवारी जाहीर केली असून यामध्ये फलंदाजांच्या क्रमवारीत मोठी उलथापालथ पाहायला मिळत आहे. बऱ्याच काळापासून अव्वल स्थानावर वर्चस्व गाजवणारा ऑस्ट्रेलियाचा फलंदाज ट्रेव्हिस हेड अखेर पहिल्या क्रमांकावरून घसरला असून इंग्लंडचा आक्रमक फलंदाज हॅरी ब्रूक आता जगातील अव्वल क्रमांकाचा कसोटी फलंदाज बनला आहे.

ताज्या क्रमवारीत हॅरी ब्रूकने एका स्थानाची झेप घेत ८५२ रेटिंग गुणांसह थेट अव्वल स्थान पटकावले आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूट यानेही एका स्थानाची सुधारणा केली असून तो ८४० रेटिंग गुणांसह दुसऱ्या स्थानावर पोहचला आहे. ऑस्ट्रेलियाच्या स्टीव्ह स्मिथने एका स्थानाची प्रगती नोंदवत ८३३ गुणांसह तिसरे स्थान गाठले आहे. याउलट दीर्घकाळापासून पहिल्या स्थानावर ठाण मांडून बसलेल्या ट्रेव्हिस हेडला मोठ्या घसरणीचा सामना करावा लागला आहे. हेड थेट तीन स्थानांनी घसरून ८१९ रेटिंग गुणांसह चौथ्या स्थानावर आला आहे. दक्षिण आफ्रिकेचा कसोटी कर्णधार टेम्बा बावुमा ७७५ गुणांसह पाचव्या स्थानी कायम आहे.

भारतीय फलंदाजांच्या क्रमवारीत या आठवड्यात कोणताही बदल झालेला नाही. भारतीय कर्णधार शुबमन गिल ७४३ गुणांसह सातव्या स्थानी, तर सलामीवीर यशस्वी जैस्वाल ७३३ गुणांसह नवव्या स्थानी कायम आहे. पाकिस्तानचा बाबर आझम ७१६ गुणांसह दहाव्या स्थानावर आहे.

# रूटने कॅलिसला टाकले मागे

**हेडिंग्ले : वृत्तसंस्था**

पाकिस्तानविरुद्ध सुरू असलेला पहिला कसोटी सामना इंग्लंडचा खेळाडू जो रूटच्या कसोटी कारकिर्दीतील १६७वा कसोटी सामना आहे. या सामन्यासाठी मैदानात उतरताच रूटने मोठ्या रेकॉर्डमध्ये दक्षिण आफ्रिकेचा माजी अष्टपैलू खेळाडू जॅक कॅलिसला मागे टाकले आहे.

कॅलिसला दक्षिण आफ्रिकेकडून १६६ कसोटी सामने खेळण्याची संधी मिळाली. कॅलिसला मागे टाकून आता रूटने इंग्लंडचा माजी खेळाडू स्टुअर्ट ब्रॉडच्या रेकॉर्डची बरोबरी केली आहे. ब्रॉडच्या नावेदेखील कसोटी क्रिकेटमध्ये १६७ सामने खेळण्याची नोंद आहे. या यादीत तो सहाव्या स्थानी पोहचला आहे.

# विजयानंतरही 'डब्ल्यूटीसी'मध्ये भारत पाचव्या स्थानावरच!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गॉल कसोटी सामन्यात भारताने श्रीलंकेचा १६५ धावांनी पराभव केला. या विजयामुळे भारतीय संघाला १२ गुण मिळाले असून संघाच्या विजयाच्या टक्केवारीतही वाढ झाली, पण टीम इंडिया जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेत (डब्ल्यूटीसी) अजूनही पाचव्या स्थानावर आहे.

श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यानंतर भारतीय संघाने डब्ल्यूटीसीच्या या चक्रात आतापर्यंत एकूण १० सामने खेळले आहेत. यापैकी संघाने पाच सामने जिंकले आहेत. या स्पर्धेत विजयासाठी १२ गुण मिळत असल्याने संघाच्या एकूण गुणांची संख्या ५२ वरून ६४वर पोहचली आहे. या सामन्यापूर्वी भारतीय संघाची 'पीसीटी'



४८.१५ इतकी होती; ती आता ५३.३३पर्यंत वाढली असून यात ५.१८ टक्क्यांची सुधारणा झाली आहे. या सामन्यापूर्वी भारतीय संघ पाचव्या स्थानावर होता आणि तो अजूनही त्याच स्थानावर कायम आहे.

डब्ल्यूटीसी २०२५-२०२७च्या गुणतालिकेत ७७.७८% पीसीटीसह ऑस्ट्रेलिया अव्वल स्थानावर आहे. ७५%सह दक्षिण आफ्रिका दुसऱ्या, तर ७२.२२% सह न्यूझीलंड तिसऱ्या स्थानावर आहे. ऑस्ट्रेलियाचा पराभव केल्यानंतर बांगलादेशने चौथे स्थान पटकावले असून, ६६.६७% पीसीटीसह ते भारतीय संघाच्या पुढे आले आहेत. दरम्यान, गॉलमधील विजयानंतर भारतीय संघ ५३.३३%सह पाचव्या स्थानावर आहे.

### अंतिम फेरीसाठी सातत्य आवश्यक

डब्ल्यूटीसीमध्ये भारतीय संघाचे अजून आठ सामने बाकी आहेत. यात श्रीलंकेविरुद्धच्या एका कसोटी सामन्याचा आणि यानंतरच्या न्यूझीलंड दौऱ्याचा समावेश आहे. त्यानंतर भारतीय संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध मायदेशात पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळेल. अव्वल दोन संघांमध्ये स्थान मिळवण्यासाठी भारताने आठपैकी सहा सामने जिंकले, एक सामना अनिर्णित राखला आणि एक गमावला, तरीही ते गुणतालिकेत दुसऱ्या स्थानावर पोहचू शकतात. याचा अर्थ असा की, तीन कसोटी मालिकांच्या कालावधीत भारत केवळ एकच सामना गमावण्याची जोखीम पत्करू शकतो. याव्यतिरिक्त षटकांच्या संथ गतीमुळे मिळणाऱ्या दंडात्मक कारवाईपासून बचाव करणेही अत्यंत महत्त्वाचे ठरेल.

# ...अन् दोन्ही गोलंदाजांना अर्धा-अर्धा चेंडू दिला कापून

**हेडिंग्ले : वृत्तसंस्था**

पाकिस्तानविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडचे वेगवान गोलंदाज ओली रॉबिनसन आणि जोश टंग यांनी प्रतिस्पर्धी संघाचा डाव अवघ्या १७१ धावांत गुंडाळला. विशेष म्हणजे, या दोघांनीच प्रत्येकी पाच बळी घेत पाकिस्तानच्या फलंदाजीचा जोरदार धक्का दिला. या ऐतिहासिक कामगिरीनंतर दोन्ही गोलंदाजांनी सामन्यातील चेंडूची समसमान वाटणी केली आणि अर्धा-अर्धा चेंडू आठवण म्हणून सोबत घेतला.

एकाच डावात दोन वेगवेगळ्या गोलंदाजांनी पाच पाच बळी घेतल्यामुळे चेंडू नक्की कुणाला द्यावा, असा प्रश्न उपस्थित झाला होता. यावर ओली रॉबिनसन आणि जोश टंग यांनी एक अतिशय मजेशीर आणि अनोखा मार्ग शोधून काढला. त्यांनी हेडिंग्लेच्या ग्राउंड स्टाफच्या मदतीने सामन्याचा चेंडू मधोमध कापून त्याचे दोन समान तुकडे केले आणि अर्धा-अर्धा चेंडू आपापल्या आठवणीसाठी स्वतःकडे ठेवला.

पुरुषांच्या कसोटी क्रिकेटमध्ये एकाच डावात इंग्लंडच्या दोन गोलंदाजांनी प्रत्येकी पाच विकेट्स घेण्याची ही १६वी वेळ ठरली. इंग्लंडसाठी यापूर्वी अशी किमया २००६मध्ये साधली गेली होती. तेव्हा स्टीव्ह हार्मिसन आणि माँटी पानेसर यांनी ओल्ड ट्रॅफर्ड येथे पाकिस्तानविरुद्धच्या एकाच डावात पाच-पाच बळी टिपले होते.

# डीपीएलमध्ये 'लायन्स'चा 'टायगर्स'वर विजय

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

दिल्ली प्रीमियर लीग (डीपीएल)मधील एका सामन्यात वेस्ट दिल्ली लायन्स संघाने मोठ्या धावसंख्येचा यशस्वी पाठलाग करत न्यू दिल्ली टायगर्सला सहा विकेट्सने पराभूत केले. अरुण जेटली स्टेडियम रंगलेल्या सामन्यात आयुष डोसेजा आणि नितीश राणाच्या अर्धशतकाशिवाय सेहवागचा मुलगा आर्यवीर याने आपल्या खास खेळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



पहिल्यांदा फलंदाजी करताना न्यू दिल्ली टायगर्सने अवघ्या ६३ धावांवर चार विकेट्स गमावल्या होत्या, पण दमदार कमबॅक करत त्यांनी निर्धारित २० षटकात सहा विकेट्सच्या मोबदल्यात १९५ धावा करत तगडे आव्हान उभे केले. हिंमत सिंहने २० चेंडूत ३५ धावा आणि केशव दलालने २२ चेंडूत ३६ धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला. त्यानंतर पार्थ बाली आणि मनीष सेहरावत यांनी सातव्या विकेटसाठी नाबाद ५७ धावांची भागीदारी रचत वेस्ट दिल्ली लायन्ससमोर आव्हानात्मक धावसंख्या उभारली. बालीने फक्त १३ चेंडूत नाबाद ३५ धावा कुटल्या. दुसऱ्या बाजूला सेहरावतने आठ चेंडूत नाबाद ३० धावांची धमाकेदार खेळी केली.

१९६ धावांचा पाठलाग करताना सेहवागचा मुलगा आर्यवीर याने कृष यादवच्या साथीने वेस्ट दिल्ली लायन्स संघाच्या डावाची सुरुवात केली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ४१ धावांची खेळी केली. आर्यवीर सेहवागने १४ चेंडूत २२ धावांची खेळी केली. मोठ्या धावसंख्येचा पाठलाग करताना छोट्याखानी खेळीसह त्याने संघाला दमदार सुरुवात करून दिली. नितीश राणाने न्यू दिल्ली टायगर्सच्या गोलंदाजांची धुलाई करताना २३ चेंडूत ५० धावांची कडक खेळी केली. कर्णधार आयुष डोसेजा याने ३३ चेंडूत नाबाद ६४ धावा करत संघाच्या विजय निश्चित केला.

वेस्ट दिल्ली लायन्सने अखेरच्या षटकात सहा विकेट्स राखून विजय मिळवला. न्यू दिल्ली टायगर्सच्या संघाकडून मनीष सेहरावतने सर्वाधिक विकेट्स घेतल्या. चार षटकात त्याने फक्त २० धावा खर्च करताना तीन विकेट्स घेतल्या, पण त्याची ही कामगिरी वेस्ट दिल्लीच्या संघाला रोखू शकली नाही.

# कर्णधार गिलने विराटला मागे टाकत गांगुलीशी केली बरोबरी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्ध खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटी सामन्यात शुबमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने शानदार कामगिरी करत १६५ धावांनी मोठा विजय मिळवला. या सामन्यात गिलला फलंदाजीत छाप पाडता आली नसली तरी त्याने कर्णधार म्हणून उल्लेखनीय कामगिरी बजावली. या कामगिरीसह त्याने भारताचा माजी कर्णधार विराट कोहलीचा विक्रम मोडला तसेच सौरव गांगुलीच्या विक्रमाशी बरोबरी साधली

भारतीय संघाचा कर्णधार म्हणून आपल्या सुरुवातीच्या १० कसोटी सामन्यांमधील कामगिरीच्या बाबतीत शुभमन गिलनेविराट कोहलीला पिछाडीवर टाकले. गिलच्या नेतृत्वाखाली भारताने पहिल्या १० कसोटींपैकी सह सामन्यांत विजय मिळवला आहे, तर तीन सामन्यांत पराभव पत्करावा लागला असून एक सामना अनिर्णित राहिला आहे. या कामगिरीसह गिलने भारताचे माजी



कर्णधार सौरव गांगुली यांच्या विक्रमाशी बरोबरी केली आहे. सुरुवातीच्या १० कसोटी सामन्यांमधील विजयांच्या बाबतीत आता केवळ महेंद्रसिंह धोनीच त्याच्या पुढे आहे.

कर्णधार म्हणून पहिल्या १० कसोटी सामन्यांत विराट कोहलीची कामगिरी फारशी चमकदार नव्हती. त्याच्या नेतृत्वाखाली भारताने तीन सामने जिंकले, दोन गमावले आणि पाच सामने अनिर्णित राहिले होते. एकंदरीत विराट हा भारताचा सर्वात यशस्वी कसोटी कर्णधार मानला जातो. त्याने ६८ कसोटी सामन्यांत भारताचे नेतृत्व केले, ज्यापैकी ४० सामने भारताने जिंकले, १७ गमावले आणि ११ सामने अनिर्णित ठरले.

# रविचंद्रन अश्विन माझा आदर्श -मानव सुथार

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा युवा फिरकीपटू मानव सुथार याने श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीनंतर आपल्या शानदार गोलंदाजीचे गमक उघड केले. गॉल इंटरनॅशनल स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या पहिल्या कसोटीत त्याने १० विकेट्स घेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आपल्या यशामागे 'स्पॉट बॉलिंग' आणि दिग्गज फिरकीपटू रविचंद्रन अश्विन यांचा मोठा वाटा असल्याचे त्याने सांगितले.



स्टार स्पोर्ट्सच्या अधिकृत एक्स अकाउंटवरून मानव सुथारचा एक खास व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. यात तो म्हणतो की, मी वयाच्या १४-१५व्या वर्षापासून दररोज ३० ते ३५ षटके गोलंदाजीचा सराव करायचो. मुख्य भर स्पॉट बॉलिंगवर (एकाच टप्प्यावर चेंडू टाकणे) असायचा. हा सराव कोणत्याही गोलंदाजाची सर्वोत्तम चेंडू टाकण्याची क्षमता विकसित करतो, असे त्याने म्हटले आहे.

रविचंद्रन अश्विनला आपला आदर्श मानत असल्याची गोष्टही मानव सुथारने बोलून दाखवली. अश्विनची गोलंदाजी आणि त्याच्या गोलंदाजीतील विविधता यामुळे नेहमीच प्रेरित झालो, असेही त्याने सांगितले.

### चेंडू ड्रिफ्ट करण्याची खासियत

भारताच्या डावखुऱ्या ऑर्थोडॉक्स फिरकीपटू मानव सुथारच्या गोलंदाजीतील सर्वात मोठी खासियत म्हणजे चेंडूला हवेत ड्रिफ्ट करण्याची त्याची क्षमता. जलदगती गोलंदाज ज्या पद्धतीने नव्या चेंडूला हवेत स्विंग करून फलंदाजाला चकवतात, त्याच धाटणीने मानव चेंडूला हवेत सरकवतो. त्यामुळे फलंदाजासाठी चेंडूचा अंदाज लावणे अधिक आव्हानात्मक होते. त्यानंतर चेंडू टप्प्यावर पडल्यावर मिळणारी फिरकी त्याची धार आणखी घातक बनवते. हवेतला ड्रिफ्ट आणि टप्प्यानंतरची फिरकी, हे सुथारच्या गोलंदाजीचे सर्वात मोठे अस्त्र ठरू शकते.

# डिव्हिलियर्सच्या मते कसोटी क्रिकेटमध्ये विराट सचिनहून सरस

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला क्रिकेटचा देव म्हटले जाते. त्याच्या नावावर अनेक विक्रम आहेत, पण पण दक्षिण आफ्रिकेचा माजी खेळाडू एबी डिव्हिलियर्सच्या मते, कसोटी क्रिकेटमध्ये विराट कोहली हा सचिनहून सरस आहे.

एबी डिव्हिलियर्स आपल्या यूट्यूब चॅनेलवर बोलताना म्हणाला, मला खूप आधीचा सचिन तेंडुलकर आठवतो, ज्याने भारतासाठी हा ट्रेंड सुरू केला होता, पण तो विराटइतका तंदुरुस्त आणि मजबूत नव्हता. विराट त्याला मागे टाकून पुढे गेला. तरीही आशियातील फलंदाज असूनही वेगवान उसळी घेणाऱ्या खेळपट्ट्यांवर उत्तम फलंदाजी करता येऊ शकते, हे दाखवून देणारा सचिन पहिलाच फलंदाज होता. विराट हीच गोष्ट पुढे घेऊन गेला आणि क्रिकेटचा स्तर आणखी वाढवला.

दोन्ही फलंदाजांची आकडेवारी पाहिली, तर सचिन तेंडुलकर अजूनही विराट कोहलीच्या खूप पुढे आहे. मुख्य बाब म्हणजे, सचिनने ज्या १५,९२१ धावा केल्या आहेत. त्यापैकी ८७०५ धावा या भारताबाहेर खेळताना केल्या आहेत. म्हणजेच एकूण धावांपैकी ५५ टक्के धावा या परदेशात फलंदाजी करताना केल्या आहेत, तर विराट कोहलीने परदेशात फलंदाजी करताना ४७७४ धावा केल्या आहेत. एबी डिव्हिलियर्सच्या मते भारताचे युवा फलंदाजही त्याच वाटेवर आहेत, जी वाट सचिन तेंडुलकर आणि विराट कोहलीने दाखवली आहे.

# 'डब्ल्यूटीसी'मध्ये जोश टंगचे विकेट्सचे अर्धशतक



**हेडिंग्ले : वृत्तसंस्था**

लीड्स कसोटीच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडचा वेगवान गोलंदाज जोश टंगने पाकिस्तानचा अर्धा संघ तंबूत धाडत मोठा डाव साधला. वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या (डब्ल्यूटीसी) चालू चक्रात ५० विकेट्स घेणारा तो पहिला गोलंदाज ठरला आहे.

लीड्समध्ये इंग्लंड आणि पाकिस्तान यांच्यातील पहिल्या कसोटीच्या पहिल्या डावात टंगने जबरदस्त गोलंदाजी केली. त्याने ९.१ षटकांत ४६ धावा खर्च करताना पाच विकेट्स घेतल्या. यासह चालू डब्ल्यूटीसी सायकलमधील त्याच्या विकेट्सची संख्या ५०वर पोहोचली. टंगने या डब्ल्यूटीसी सायकलमध्ये १० सामन्यांत ५० विकेट्स घेतल्या असून सध्या तो स्पर्धेत सर्वाधिक विकेट्स घेणारा गोलंदाज आहे.

टंगपाठोपाठ या यादीत ऑस्ट्रेलियाच्या मिचेल स्टार्कचा नंबर लागतो. त्याने आतापर्यंत ४८ विकेट्सस घेतल्या असून भारताचा मोहम्मद सिराज ४१ विकेट्ससह या यादीत तिसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंडचा माजी कर्णधार बेन स्टोक्स ३९ विकेट्स घेत चौथ्या, तर वेस्ट इंडिजचा जेडन सील्स ३५ विकेट्स खात्यात जमा करून अव्वल पाचमध्ये आहे. चौथ्या चक्रात आघाडीच्या पाच गोलंदाजांच्या यादीत मोहम्मद सिराज हा एकमेव भारतीय गोलंदाज आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com